अभियान पुस्तिका

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर



# नगर विकास विभाग

## महाराष्ट्र शासन





# स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) 2.0

# कचरामुक्त शहरे








स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

स्वच्छतेचे अष्टमार्ग

स्वच्छ शहर

हगणदारीमुक्त शहर

HARIT
MAHA City Compost

SAFAIMITRA SURAKSHA CHALLENGE







# मा. श्री. नरेंद्र मोदी

**पंतप्रधान, भारत**

"... स्वच्छ भारत मिशन २.० का लक्ष्य है गार्बेज फ्री शहर, कचरे के ढेर से पूरी तरह मुक्त, ऐसा शहर बनाना ..."

१ ऑक्टोबर २०२१ रोजी स्वच्छ भारत मिशन - नागरी २.० च्या शुभारंभप्रसंगी पंतप्रधानांच्या भाषणातील काही अंश



# मा. श्री. एकनाथ शिंदे

## मुख्यमंत्री, महाराष्ट्र

## स्वच्छता संकल्प

“स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत, महाराष्ट्र सरकारची वाटचाल ही “ODF+ शहरे” वरून “ODF++ व Water+ शहरांकडे” आणि “कचरामुक्त शहरे” म्हणजे स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनाच्या संपूर्ण सेवा साखळीला संबोधित करणे असे संकल्पित केले आहे.”

३० सप्टेंबर २०२२



# मा. श्री. देवेंद्र फडणवीस

## उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र

# स्वच्छता संकल्प

“ योग्य नियोजन केल्यास स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची उद्दिष्टे विहित वेळेस साध्य होण्यास मदत होईल. हे अभियान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पुढाकाराने व राज्य शासनाच्या मदतीने पूर्णत्वास जाणार आहे ”

३० सप्टेंबर २०२२

# स्वच्छतेचे अष्टमार्ग

अभियान कालावधी ऑक्टोबर २०२१ ते ऑक्टोबर २०२६

## संकल्प स्वच्छतेचा

- १. घरगुती/कुटुंब स्तरावर कचऱ्याचे विलगीकरण
- २. १००% घरोघरी घनकचरा संकलन
- ३. १००% कचऱ्याचे शास्त्रशुद्ध पद्धतीने व्यवस्थापन व लँडफिलींग
- ४. जुन्या साठलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया आणि त्या ठिकाणाचे हरित क्षेत्रामध्ये रूपांतर
- ५. निर्धारित वेळापत्रकानुसार मैला व्यवस्थापन तसेच वापरलेल्या पाण्याची विल्हेवाट लावण्या करिता १००% सुरक्षित संकलन, वहन, आणि प्रक्रिया करणे
- ६. वैयक्तिक घरगुती शौचालय
- ७. आकांक्षीत सार्वजनिक शौचालये
- ८. आंतरविभागीय अभिसरण उपक्रमाद्वारे शहरव्यापी सर्वसमावेश स्वच्छता आणि सफाई मित्र सुरक्षित शहर बनवणे

# अभियान घटक






## अभियान अपेक्षित परिणाम

- **GFC ★★★** — सर्व शहरे
- **ODF+** — सर्व शहरे
- **ODF++** — १ लाखापेक्षा कमी लोकसंख्येची सर्व शहरे
- **WATER+** — १ लाखापेक्षा कमी लोकसंख्येची ५०% शहरे

# स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत महाराष्ट्र सरकारचे महत्त्वाचे टप्पे

## #१ मंत्रिमंडळाची मान्यता

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० करिता रुपये १२,४०० कोटींची योजना मंजूर

## #२ क्षमता बांधणी कार्यशाळा

डॉ.सोनिया सेठी (भा.प्र.से.), प्रधान सचिव (नवि-२) यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शहरांसाठी स्वच्छ भारत अभियान (ना) २.० अंतर्गत शाश्वत स्वच्छता आणि शहर घनकचरा व्यवस्थापनासाठी आयोजित कार्यशाळे मध्ये मार्गदर्शन करताना.




## #3 स्वच्छ महाराष्ट्र अभियान कृती योजनेसाठी राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC), उच्चाधिकार समिति (SHPC) आणि राष्ट्रीय सल्लागार आणि आढावा समितीची (NARC) मान्यता

राष्ट्रीय सल्लागार आणि आढावा समितीने (NARC) दिनांक १५/९/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये राज्याच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० करीता रूपये १२९९७. कोटी किंमतीचा आराखडा मंजूर केला

(रू.कोटीत)

| अ.क्र. | बाब | केद्र हिस्सा | राज्य हिस्सा | नागरी स्वराज्य स्थानिक संस्था हिस्सा | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शहर स्वच्छता कृती आराखडा (CSAP) | 1647.91 | 4363.11 | 1029.69 | 7040.71 |
| 2 | शहर घनकचरा व्यवस्थापन कृती आराखडा (CSWAP) | 1438.10 | 1707.18 | 1692.22 | 4837.50 |
| 3 | माहिती, शिक्षण, प्रसार (IEC) | 447.10 | 298.07 | - | 745.18 |
| 4 | क्षमता बांधणी (CB) | 224.70 | 149.80 | - | 374.48 |
| | **एकूण** | **3757.81** | **6518.16** | **2721.91** | **12997.87** |

# स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत महाराष्ट्र सरकारचे महत्त्वाचे टप्पे

## #४ आझादी का अमृत महोत्सव





## #५ स्वच्छ उत्सव कलाकृती

## #६ इंडियन स्वच्छता लीग



# १

# शहर स्वच्छता कृती आराखडा (CSAP)



# वैयक्तिक घरगुती शौचालयांच्या बांधणीसाठी जास्तीत जास्त प्रचार करणे



| | | | |
|---|---|---|---|
| १,८८,३३४ वैयक्तिक शौचालये बांधणे | शौचालयासाठीचे अनुदान | एक घर एक शौचालय | माझे कुटुंब माझी जबाबदारी |

## प्रमुख आव्हानांवर मात करणे

### बांधकामासाठी जागेची मर्यादा

- ✓ जागा, डिझाइन आणि तांत्रिक उपायांचा अनुकूल वापर
- ✓ गट शौचालये
- ✓ मागणी आधारित अर्ज मागवणे

### पायाभूत सुविधांचा अभाव

- ✓ दाटीवाटीच्या क्षेत्रात नेटवर्क सेवा उपलब्ध करणे
- ✓ सामुदायिक सेप्टिक टाक्या

### कार्यकाळ समस्या

- ✓ जमिनीच्या मालकी संदर्भात अडचणी दूर करणे
- ✓ शहरातील ज्या घरांकडे शौचालय सुविधा नाही अशी घरे शोधणे
- ✓ वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी जलद मंजुरी प्रक्रिया

### वर्तणूक बदल

- ✓ महिला, मुले, वृद्ध, दिव्यांग यांच्या गरजांवर लक्ष केंद्रित करून माहिती, शिक्षण, प्रसार मोहीम
- ✓ महिला आणि तरुणांचा सहभाग वाढविणे

# आकांक्षी सार्वजनिक शौचालये

पर्यटन/धार्मिक/ऐतिहासिक स्थळांच्या ठिकाणी सार्वजनिक शौचालये बांधण्यावर भर देणे

आपल्या शहराच्या स्वच्छतेची ओळख म्हणजे शहरातील सार्वजनिक शौचालये

**अल्पकालीन लक्ष्य**

- ५० - ६० आकांक्षी शौचालय फेब्रुवारी २०२३ च्या मध्यापर्यंत
- उत्तम अनुभव आणि शहरांची सकारात्मक प्रतिमा निर्मिती

**दीर्घकालीन लक्ष्य**

- पीपीपी मॉडेल अंतर्गत ५५ शहरांमध्ये ४०० हुन अधिक आकांक्षी शौचालय बांधणे
- पर्यटक आकर्षण आणि स्वच्छ आणि आरोग्यदायी शहरे

## आकांक्षी शौचालयांची वैशिष्ट्ये

- स्वच्छ भिंती आणि फरशी
- मुलांसाठी अनुकूल शौचालय आणि मुतारी
- शौचलयांच्याआजूबाजूच्या परिसरात हिरवा परिसर सुस्थितीत असणे
- जाहिरातीसाठी जागा
- पेपर नॅपकिन्स आणि हँड ड्रायरची उपलब्धता
- सॅनिटरी व्हेंडिंग मशीन आणि इन्सिनरेटरसह महिला स्वच्छतागृह
- शौचालयाच्या बाहेरील आणि आतील बाजूस पुरेशी प्रकाश व्यवस्था
- पाण्याचा अपव्यव टाळण्यासाठी आणि विजेचे निरीक्षण करण्यासाठी एसएमएस/आयसीटी आधारित फीडबॅक प्रणाली

## संभाव्य मॉडेल

- वापरण्यासाठी विनामूल्य - सर्व खर्च स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारे
- संकरित
- पैसे द्या आणि वापरा
- क्रॉस सबसिडी - जाहिरातीद्वारे

## मंजूर झालेले प्रकल्प आणि निधी

✓ सामुदायिक शौचालये - १६,९०५ सिटस्

✓ आकांक्षी शौचालये - ३,२३८ सिटस्

✓ सार्वजनिक शौचालये - ४,२९२ सिटस्

✓ सार्वजनिक मुतारी - ६,८३०

# वापरलेल्या पाण्याचे नियोजन

स्वच्छ भारत अभियान (ना) २.० चे उद्दिष्ट हे १ लाखांपेक्षा कमी लोकसंख्येच्या शहरांमध्ये वापरलेल्या पाण्याचे व्यवस्थापन करणे. १ लाखाहून अधिक लोकसंख्या असलेली शहरे AMRUT २.० मध्ये समाविष्ट आहेत

- सर्व वापरलेले पाणी सुरक्षितपणे संकलित करून, त्यावर प्रक्रिया करणे आणि त्याचा पुनर्वापर करणे. प्रक्रिया न केलेले कोणतेही पाणी जलस्रोतांमध्ये सोडले जाणार नाही.
- सर्व मैला योग्यरित्या उपसा केला जाऊन त्यावर प्रक्रिया करून मगच त्याची विल्हेवाट लावली जाते
- वापरलेल्या पाण्याचा पुनर्वापर करणे
- सर्व शहरे ODF++ म्हणून प्रमाणित करणे
- १ लाख पेक्षा कमी लोकसंख्या असलेली ५०% शहरे Water+ म्हणून घोषित करणे

## पात्र घटक






- सांडपाणी प्रक्रिया केंद्र (STP - cum FSTP) उभारणे
- यांत्रिक पद्धतीने निर्धारित वेळापत्रकानुसार मैला उपसा व गटार साफ करणे
- प्रस्तावित STP ला आणि शहराच्या मध्य क्षेत्राला जोडणाऱ्या मुख्य नेटवर्कच्या लांबीसाठी इंटरसेप्टर आणि डायव्हर्शन ड्रेन (I&D)
- राज्य अर्थसहाय्यित घटक- मलनिस्सारण नेटवर्क / महानगरपालिका नाले मजबूत करणे

## मंजूर प्रकल्प आणि निधी

- ✓ सांडपाणी व्यवस्थापन प्रक्रिया प्रकल्प - ३५८ शहरांकरीता (१६५६ MLD)
- ✓ नाला अडवणे व वळवणे - ३६८ शहरांकरीता (१८२३ किलोमीटर)
- ✓ गाळ उपसा करण्यासाठीची उपकरणे - ३६८ शहरांकरीता (४७९ वाहने)



उघड्या नाल्यांमध्ये सांडपाण्याची विल्हेवाट लावण्याऐवजी, घरगुती /सार्वजनिक/ सामुदायिक शौचालय बंदिस्त नाल्याद्वारे इंटरसेप्टर आणि डायव्हर्शन ड्रेनशी जोडणे. ज्यामुळे वापरलेले पाणी पर्यावरणात सोडण्यापूर्वी त्यावर प्रक्रिया करण्यासाठी STP कडे वळविले जाईल

# वॉटर+ शहर

घरगुती, व्यावसायिक आस्थापना, गटारी, नाले इत्यादींमधून सोडले जाणारे सांडपाणी पर्यावरणात सोडण्यापूर्वी त्यावर समाधानकारक पातळीवर प्रक्रिया केली जाते.





पायाभूत सुविधांची योग्य देखभाल आणि खर्च वसुली सुनिश्चित केली जाते

सांडपाणी आणि सांडपाणी प्रक्रिया करण्याच्या सुविधांमध्ये पुरेशी क्षमता असणे आवश्यक आहे.





सार्वजनिक आरोग्यावर हानिकारक परिणाम टाळण्यासाठी, सांडपाणी पर्यावरणात सोडण्यापूर्वी त्याचा प्रतिकूल परिणाम कमी केला जातो.





संकलन कार्यक्षमतेला चालना देण्यासाठी, सांडपाणी गोळा करण्यासाठी एक चांगले नेटवर्क असले पाहिजे ज्यामध्ये पावसाच्या पाण्याची व्यवस्था देखील समाविष्ट आहे.



शाश्वतता प्राप्त करण्यासाठी, प्रक्रिया केलेले सांडपण्याचा पुनर्वापर केला जातो.

## वॉटर+ मिळवण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि नियम

१. भूमिगत गटार, सेप्टिक टँक किंवा नाल्यातून वापरलेले पाणी संकलित करणे, त्याचे वहन आणि जवळच्या STP मध्ये सुरक्षितपणे पोहोचविणे.

२. मैल्यासह सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थामधील प्रक्रिया केंद्र सक्षम असावे

३. दर ३ वर्षांनी सेप्टिक टाक्या मधून मैला उपसा करण्यासाठी पुरेशी उपसा क्षमता आणि वाहतूक क्षमता असलेल्या वाहनांची संख्या पुरेशी असावी.

४. गटारे नियमितपणे साफ केले जावेत

५. २५% प्रक्रिया केलेले सांडपाणी प्रक्रिया केल्यानंतर पुन्हा वापरले जावे

६. STP/FSTP/Sewer नेटवर्कचा १००% O&M खर्च महसुलातून वसूल केला जाईल

# ओडीएफ++ शहर



ODF आणि ODF+ होण्यासाठीच्या सर्व अटी अनिवार्यपणे पूर्ण करणे



कोणत्याही जलकुंभात किंवा खुल्या भागात प्रक्रिया न केलेले सांडपाणी, ज्यामध्ये मैला आणि मैल्याचे सांडपाणी देखील समाविष्ट आहे, असे टाकले जाऊ शकत नाही



मैला सुरक्षितपणे व्यवस्थापित करणे आवश्यक

## ओडीएफ++ साध्य करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि नियम

१ सर्व वापरातील शौचलयांमध्ये स्वच्छता असली पाहिजे आणि CT/PT स्वच्छता scoring Matrix नुसार चांगली राखली गेली पाहिजे

२ जी घरे भूमिगत गटारासोबत जोडली नाहीत अशा सर्व घरांमध्ये शोषखड्ड्यासह सेप्टिक टाकी असावी. Sewer Network/सेप्टिक टाकी मधील outflow हा प्रक्रिया केंद्राला जोडलेला असावा

३ घरगुती /सामुदायिक/सार्वजनिक शौचलयांमध्ये शोषखड्डयासाठी पुरेशी जागा नाही, अशा परिस्थितीत सांडपाणी महापालिकेच्या नाल्याद्वारे जवळच्या STP मध्ये पाठवले जाईल आणि प्रक्रीयेनंतरच पर्यावरणात सोडले जाईल

४ वर्षातून दोनदा सेप्टिक टाक्या आणि शोषखड्डे यांची नियोजित तपासणी करावी

५ मैला उपसण्यासाठीची वाहने पुरेशा संख्येची असावीत आणि स्वच्छता पोर्टलशी जोडून असताना GPS प्रणालीवर Track केली जावीत

६ आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य दृष्टिकोन म्हणून, शहरे जवळील STP सह-प्रक्रियेचा पर्याय उपलब्ध करू शकतात

७ FSSM ची O&M किंमत समर्पित स्वच्छता कर/वापरकर्ता शुल्काच्या आगाऊ पेमेंटद्वारे वसूल केली जावी

# निर्धारित वेळापत्रकानुसार मैला उपसा करणे
## (Scheduled Desludging)



तक्रारी / मैला उपसाच्या मागणीची वाट न पाहता ३ वर्षांच्या नियोजित वेळापत्रकानुसार सर्व सेप्टिक टाक्या उपसा केल्या जातील

प्रक्रियेच्या जागी सुरक्षितपणे विल्हेवाट लावणे

मैला उपसा करण्यासाठीची उपकरणे - ३६८ शहरांकरीता (४७९ वाहने)

## निर्धारित वेळापत्रकानुसार मैला उपसा सेवेसाठी शहर कसे नियोजन करू शकते?

- मालमत्ता कर नोंद किंवा घरगुती आणि स्वच्छता सर्वेक्षणावर आधारित शौचालये आणि सेप्टिक टाक्यांची अद्यावत माहिती असणे
- पायाभूत सुविधांचे मूल्यांकन करणे जसे की- झोनची संख्या आणि मैला गाडीच्या मार्गचे नियोजन, दररोज साफ कराव्या लागणाऱ्या सेप्टिक टाक्या ,आवश्यक असणाऱ्या मैला गाड्या, प्रति मैला गाडी प्रति दिवस शक्य फेऱ्या, मानवी संसाधनांची आवश्यकता, प्रक्रियेसाठी मैलांचे प्रमाण.
- मैला उपसाची सेवा तसेच खाजगी संस्थांचा समावेश
- मैला उपसा प्रक्रियेच्या कामगिरीचे दैनिक निरीक्षण
- जागरुकता निर्माण करणे - पत्रिका, घरोघरी भेटी, बॅनर, पोस्टर्स, भितीचित्रे आणि प्रसार माध्यमाद्वारे माहिती प्रसारित करणे.

# २

# शहर घनकचरा व्यवस्थापन कृती आराखडा (CSWAP)



# शाश्वत घनकचरा व्यवस्थापन

| स्वच्छ भारत अभियान १.० उपलब्धी | स्वच्छ भारत अभियान २.० उद्दिष्ट |
|---|---|
| १२१ शहरे ★★★<br>१ शहर ★★★★★ | ४१२ शहरे ★★★<br>१०% शहरे ★★★★★ |

## सर्व शहरांना ही ३ स्टार कचरा मुक्त शहर मानांकन मिळवणे

i. १००% कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रियेसह सर्व शहरे कचरा मुक्त आणि स्वच्छ ठेवणे
ii. २४ NCAP शहरांमध्ये घनकचऱ्यामुळे होणारे हवा प्रदूषण कमी करणे
iii. एकल वापर प्लॅस्टिकचे प्रमाण टप्प्या-टप्प्याने कमी करणे

## दृष्टी

- कुटुंब स्तरावर कचऱ्याचे १००% विलगीकरण. म्हणजेच ओला, सुका, धोकादायक तसेच सॅनिटरी अंश्या स्वरूपात कचऱ्याचे विलगीकरण.
- प्रत्येक घरातून विलगीकरण केलेला कचरा संकलित करणे
- सर्व कचऱ्याची १००% शास्त्रोक्त व्यवस्थापनासह सुरक्षित विल्हेवाट तसेच शास्त्रोक्त लँडफिल
- सर्व जुना साठलेला कचऱ्यावर (legacy waste) प्रक्रीया करून त्यांचे रूपांतर हरित क्षेत्रात करणे

## सर्व शहरांमध्ये अपेक्षित बदल

1. प्रत्येक घरातील १००% कचरा संकलन
2. प्रत्येक घरातील १००% कचरा विलगीकरण
3. १००% कचऱ्यावर प्रक्रिया (ओला, सुका आणि बांधकाम निगडीत विलगीकरण);
4. सुरक्षित, प्रमाणबद्ध आणि शास्त्रोक्त विल्हेवाट: निष्क्रिय आणि प्रक्रिया न झालेल्या कचऱ्याचे शास्त्रोक्त लँडफिल
5. जुन्या साठलेल्या कचऱ्यावर (legacy waste) उपाय योजना
6. ५ लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरांसाठी तसेच राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमांतर्गत उर्वरित शहरांमध्ये बांधकामाशी निगडित कचरा व्यवस्थापन (Construction and Demolition)
7. सर्व शहरे किमान ३ स्टार कचरा मुक्त शहरे करणे

# शहर घनकचरा कृती आराखड्याचे (CSWAP) पुढील नियोजन

## अपेक्षित सेवा पातळी प्राप्तीमधील अंतर

CSWAP द्वारे घनकचरा प्रक्रिया क्षमता, जुना साठलेल्या कचऱ्यावरील प्रक्रिया, यांत्रिकी झाडू व बांधकाम कचऱ्याच्या प्रक्रिया मधील सेवा पातळी मधील अंतर कमी करणे

## निष्पत्ती

कचऱ्याचे अपेक्षित शास्त्रोक्त व्यवस्थापन करण्याकरिता शहर घनकचरा व्यवस्थापन कृती आराखड्यामुळे (CSWAP) मदत

## पायाभूत सोयीसुविधा

३ स्टार कचरा मुक्त शहर मानांकन मिळविण्यासाठी येणाऱ्या अडथळे कमी करण्यासाठीची उपाय योजना

## शहर घनकचरा व्यवस्थापन कृती आराखड्यामधील (CSWAP) कार्यक्रमाचे घटक

१. कचरा प्रक्रिया केंद्र २. जुन्या साठलेल्या कचऱ्यावर उपाय योजना ३. बांधकाम निगडित कचरा प्रक्रिया केंद्र ४. यांत्रिक उपकरणांमार्फत स्वच्छता ५. वैज्ञानिक लँडफील

## अंमलबजावणीकरिता धोरण

शहरांनी वार्षिक स्वच्छ सर्वेक्षणाकरिता बनविणे

## तांत्रिक दृष्ट्या पात्र संस्थांची नेमणूक

सविस्तर प्रकल्प आराखड्याचे तांत्रिक व आर्थिक मूल्यमापन

# 3 सफाई मित्र सुरक्षा



# सफाई मित्र सुरक्षित शहर

## ध्येय: स्वच्छतेच्या कामामध्ये शून्य मृत्यू

- ✓ स्वच्छतेसाठी यांत्रिक उपकरणे वापरण्याकरिता सफाई कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण
- ✓ स्वच्छतेसाठी हाताने मैला काढणे / गटार साफ करण्यास सक्त मनाई - हाताने सफाई निषिद्ध करून यांत्रिक उपकरणांमार्फत सफाई
- ✓ स्वच्छता उदयमी योजनेअंतर्गत कर्ज घेण्यास इच्छुक असणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना काम मिळेल याची खात्री देणे
- ✓ सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यासाठी तसेच त्यांच्या संवेदना कळाव्यात यासाठी जनजागृती (माहिती, शिक्षण आणि प्रसार)
- ✓ सर्व नोंदणीकृत सफाई कर्मचाऱ्यांना PM-JAY योजने अंतर्गत आरोग्य विमा मिळेल याची खात्री करणे
- ✓ सर्व नोंदणीकृत सफाई कर्मचाऱ्यांना सर्व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळेल याची काळजी घेणे
- ✓ स्वछता उद्यमी योजनेअंतर्गत 'यांत्रिक उपकरणांमार्फत स्वछता' ही संकल्पना राबविणे





Ministry of Housing and Urban Affairs
Government of India

SAFAIMITRA SURAKSHIT SHEHAR
DECLARATION

...................................................Municipal Corporation/ Municipality/ Town Panchayat has the following provisions:

1. Responsible Sanitation Authority has been nominated;
2. the ULB is served by ........................................ Municipal Corporation Emergency Sanitation Response Unit/District Emergency Sanitation Response Unit;
3. the ULB has a functional helpline number ...................14420/equivalent;
4. the ULB holds adequate and skilled manpower (sewer men and sanitary beldars)
5. the ULB has identified Sewer Entry Professionals and they have undergone the prescribed 15 days of training programme or will undergo the same within 90 days of submission of the declaration protocol;
6. the ULB holds adequate equipment and safety gear;
7. the ULB has created adequate awareness generation to sensitize the public;

thereby, declaring it as 'Safaimitra SurakshitShehar' as per MoHUA's protocol.

..........................................................................
(Signature and Name of CEO/Commissioner/Executive Officer)

Designation:

Date:

Seal

नये भारत का नया ऐलान मशीन से सफाई, सुरक्षा व सम्मान

# ४

# क्षमता बांधणी, सामुदायिक सहभाग आणि माहिती, शिक्षण, प्रसार (IEC) मोहिम धोरण



# क्षमता बांधणी, कौशल्य विकास आणि ज्ञान व्यवस्थापन

**क्षमता बांधणीसाठी निधी: ५०% राज्य सरकार हिस्सा
५०% स्थानिक स्वराज्य संस्थांचा हिस्सा**

## दृष्टीकोन:

सर्व शहरांना "कचरामुक्त" शहरे हे ध्येय साध्य करण्यासाठी आणि स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० च्या इतर सर्व उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी, स्थानिक पातळीवर प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी, स्थानिक स्वराज्य संस्थांनी सर्व भागधारकांची क्षमता बांधणी करणे आणि कौशल्ये विकसित करणे.

| | |
|---|---|
| **राज्य सरकार आणि संलग्न अधिकारी** | ऑनलाइन शिक्षण अभ्यासक्रम, कार्यशाळा इ. च्या माध्यमातून सर्वांगीण नेतृत्व विकासाला संस्थात्मक स्वरूप देणे आणि व्यवस्थापनात बदल करणे. |
| **स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रशासकीय अधिकारी** | या अभियानांतर्गत प्रभावी अंमलबजावणी आणि सेवा वितरणासाठी सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक वातावरणाच्या दिशेने संवेदनशीलता निर्माण करून मनुष्यबळ विकास करणे. |
| **स्वच्छता कर्मचारी आणि सफाईमित्र** | कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय, एनएसडीसी आणि संबंधित क्षेत्र कौशल्य परिषदांच्या भागीदारीत कौशल्य विकास आणि स्वच्छता क्षेत्रातील उद्योजकतेला प्रोत्साहन देणे. |
| **स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक आणि कौशल्य संस्था आणि इतर संस्था** | क्षमता बांधणी प्रशिक्षण देण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयांसह एनसीसी, एनएसएस, एनवायके, कौशल्य संस्था यासारख्या संस्थांच्या विविध संचांना गुंतवून ठेवणे |

# क्षमता बांधणी, कौशल्य विकास आणि ज्ञान व्यवस्थापन

**ज्ञान व्यवस्थापन**

विविध उपक्रमांच्या अंमलबजावणीदरम्यान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने विकसित केलेले प्रशिक्षण मॉड्यूल साहित्य, व्हिडिओ, योजना आणि अहवाल एकत्रित केले जातील आणि एसबीएम-यू ई-लर्निंग पोर्टलवर अपलोड केले जातील

## अपेक्षित निष्पत्ती

**क्षमता बांधणी, कौशल्य विकास आणि ज्ञान व्यवस्थापन**

- नेतृत्व विकास
- स्थानिक स्वराज्य संस्थांची आणि सफाई कर्मचाऱ्यांची व्यवस्थापन क्षमता बदलणे
- सुधारित ज्ञान आणि कौशल्ये

अशी अपेक्षा आहे की क्षमता निर्मिती, कौशल्य विकास आणि ज्ञान व्यवस्थापन या उपक्रमांच्या परिणामांमुळे कार्यशाळा, चर्चासत्रे, प्रशिक्षण इत्यादींच्या माध्यमातून अभियानाच्या अंमलबजावणीशी संबंधित नागरी स्थानिक संस्थांचे अधिकारी आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या क्षमतांमध्ये सुधारणा होईल.

# माहिती, शिक्षण, प्रसार आणि वर्तणूक बदल योजना

## दृष्टीकोन:

जनजागृतीसाठी मोठ्या प्रमाणावर नागरिकांपर्यंत पोहोचण्यासह जनजागृती सुनिश्चित करण्यासाठी जन-आंदोलन, संस्थात्मक स्वच्छ वर्तन आणि कृती, "कचरामुक्त" शहरे साध्य करण्यासाठी आणि शहरी स्वच्छतेची साध्य केलेली कामे टिकवून ठेवण्यासाठी.

स्वच्छ भारत अभियान - (नागरी) अंतर्गत जन-आंदोलन मधून २० कोटी शहरी नागरिक जोडले

प्रत्येक नागरिकाचा आणि प्रत्येक भागधारकाचा सहभाग यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे

औपचारिक निर्मिती आणि नोंदणी सुलभ करणे

स्थानिक स्वराज्य संस्था

नागरिक स्वयंसेवकांचा सहभाग

एनयूएलएम(NULM), एनयूएचएम(NUHM), आशा,अंगणवाड्या, बचत गट, अशासकीय संस्था , तरुण/महिला गट, समुदायावर आधारित संस्था, रेसिडेंट वेल्फेअर असोसिएशन(RWA), सामान्य नागरिक (उदा. शिक्षक, ज्येष्ठ नागरिक, सेवानिवृत्त कर्मचारी

तयार केलेल्या मालमत्तेच्या कार्यक्षम कार्याचे नियमितपणे पुनरावलोकन आणि निरीक्षण करण्यासाठी निवडक नागरिक प्रतिनिधींच्या सहभागासह शहर स्वच्छता समित्यांची स्थापना करणे.

# माहिती, शिक्षण, प्रसार आणि वर्तणूक बदल योजना

## अपेक्षित निष्पत्ती

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने दर महिन्याला आयइसी (IEC) वरील खर्चाचा अहवाल राज्य अभियान संचालनालय आणि राज्यांनी केंद्राच्या स्वच्छ भारत अभियान - (नागरी) येथे पोर्टलवर सादर करणे बंधनकारक आहे

### माहिती, शिक्षण, प्रसार आणि वर्तणूक बदल उपक्रम

- एकल वापराच्या प्लास्टिकच्या वापराच्या हानीकारक परिणामांबद्दल नागरिकांना जागरूक करणे आणि त्यांचा वापर कमी करण्यासाठी चालना देणे



- घरातील कचरा दोन कचरापेटीत विभागून त्याची योग्य विल्हेवाट लावतील



- सेप्टिक टाक्या निर्धारित वेळी उपसा करण्याच्या आवश्यकतेबाबत नागरिकांना जागरूक करणे आणि त्यानुसार त्याचे पालन करायचे निर्देश देणे.



- नागरिकांनी त्यांच्या परिसरातील कोणत्याही स्वरुपात कचरा न स्वीकारण्याबाबत आणि त्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी कृती करण्याबाबत जागरूक करणे






**ओडीएफ + स्वच्छ भारत अभियान - शहरी साठी आयइसी मोहीम सामग्री आणि स्वयंपाकघरातील कचऱ्याची सुरक्षित विल्हेवाट सुनिश्चित करणे**






# ५

# माहिती तंत्रज्ञान (IT) सक्षम शासन प्रणाली



# माहिती तंत्रज्ञान प्रणाली, क्षमता बांधणी, कौशल्य विकास आणि ज्ञान व्यवस्थापन करीता

मिशन प्रगतीचे पारदर्शक आणि वस्तुनिष्ठ निरीक्षण आणि मूल्यमापन सुलभ करण्यासाठी, सर्व भागधारकांद्वारे सुलभ आणि अखंड वापरकर्ता अनुभव सुनिश्चित करण्यासाठी आणि मिशन पेपरलेस बनवण्यासाठी, सर्वांमध्ये परिणामांचे मानकीकरण सुनिश्चित करण्यासाठी, नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी विकसित केलेल्या विविध डिजिटल सक्षमतेची गणना करते

## स्वच्छ भारत अभियान (नागरी) इंटिग्रेटेड प्लॅटफॉर्म

प्लॅटफॉर्म राज्य/ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील माहितीचे प्रमाणीकरण करते आणि सर्व स्तरांवर डेटा सुसंगततेचा एकच स्रोत सुनिश्चित करते

## भू-स्थानिक (जिओ टॅग) ट्रॅकिंग प्रणाली



राज्ये/ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांचे SHPC-मंजूर प्रकल्प प्रस्ताव अपलोड करण्यास सक्षम करण्यासाठीचे प्रकल्पाचे GIS-आधारित देखरेख करेल प्रकल्प साइटवरील प्रगतीची छायाचित्रे त्याच्या भौगोलिक अक्षांश - रेखांश सह वेळोवेळी ऑनलाइन अपलोड करणे

## स्वच्छता ॲप




एक मोबाईल आधारित ॲप्लिकेशन जे नागरिकांना स्वच्छतेशी संबंधित तक्रारी नोंदविण्यास सक्षम करते आणि नागरिकांच्या तक्रारींचे कार्यक्षमतेने आणि प्रभावीपणे निराकरण करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेला सक्षम करते

## Google नकाशे आणि सार्वजनिक/ सामुदायिक शौचालये फीडबॅक सिस्टम असलेली शौचालये




सार्वजनिक/ सामुदायिक शौचालये Google नकाशावरून चिन्हांकित केल्याने आहेत–शोधण्यास सोपे सार्वजनिक/ सामुदायिक शौचालच्या स्वच्छतेबाबत अभिप्राय

# माहिती तंत्रज्ञान प्रणाली, क्षमता बांधणी, कौशल्य विकास आणि ज्ञान व्यवस्थापन करीता

## एकात्मिक मॉड्यूलद्वारे वार्षिक GFC रेटिंग, स्वच्छ सर्वेक्षण आणि ODF मूल्यांकन

SWACHH SURVEKSHAN
#Mera Shahar, Meri Pehchan 2023

मूल्यांकनाकरीता ऑनलाइन डेटा नोंदवण्यासाठी, स्व-मूल्यांकन करण्यासाठी डिजिटल साधने, डेस्कटॉप मूल्यांकनासाठी आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे यासाठी एकात्मिक प्रणाली तयार केली जात आहे.

## १४४२० हेल्पलाइन




नागरिकांच्या तक्रारी नोंदवण्यासाठी सर्व दूरसंचार सेवा प्रदात्यांसाठी राष्ट्रीय हेल्पलाइन क्रमांक

दस्तऐवज व्यवस्थापन प्रणाली, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म, माहिती, शिक्षण, प्रसार (IEC), उपक्रम ट्रॅकिंग सिस्टम, मूल्यांकन यंत्रणा या काही IT आधारित प्रशासन प्रणाली आहेत

## स्वच्छ भारत अभियान (ना) मालमत्ता आणि पायाभूत सुविधांचे GIS मॅपिंग






MoHUA ने वेब आणि मोबाईल ॲप्लिकेशन विकसित केले आहेत जे सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या शहराच्या सीमा, प्रभाग सीमा, मालमत्ता रेखांकित करण्यास सक्षम करतील.

## डॅशबोर्ड आणि विश्लेषण प्लॅटफॉर्म



स्वच्छ भारत अभियान (ना) २.० च्या प्रगतीचे परीक्षण करण्यासाठी विश्लेषणात्मक डॅशबोर्ड, डेटा मानकीकरण आणि प्रमाणीकरण यंत्रणा AI - चालित घटक जसे की चॅटबॉट आणि भविष्यसूचक विश्लेषणे.

आज़ादी का अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय
भारत सरकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

# स्वच्छ भारत मिशन - नागरी २.०



# शहरे कचरामुक्त करणे

परिचालन मार्गदर्शक तत्वे

ऑक्टोबर २०२१

# अनुक्रमणिका

प्रकरण १ प्रस्तावना

प्रकरण २ थोडक्यात स्वच्छ भारत अभियान-नागरी २.०

प्रकरण ३ अभियान व्यवस्थापन संरचना

प्रकरण ४ निधी संरचना

प्रकरण ५ शौचालये सार्वजनिक /समुदाय, आयएचएचएल (शौचालये, मुतारी)

प्रकरण ६ घन कचरा व्यवस्थापन

प्रकरण ७ वापरलेल्या पाण्याचे व्यवस्थापन

प्रकरण ८ आयईसी (माहिती, शिक्षण व प्रसार) आणि वर्तणूक बदल

प्रकरण ९ क्षमता निर्माण, कौशल्य विकास आणि ज्ञान व्यवस्थापन

प्रकरण १० माहिती तंत्रज्ञान आधारीत शासन

# प्रकरण १ प्रस्तावना

**स्वच्छ भारत अभियान - नागरीच्या आतापर्यंतच्या यशाचे विहंगावलोकन आणि स्वच्छ भारत अभियान - नागरी २.० चा परिचय.**

शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) सार्वजनिक स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता तसेच आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याची सवय आणि आरोग्यपूरक स्वच्छता यावर लक्षणीय भर आहे. जागतिक स्तरावर असे दिसून आले आहे की अधिक चांगली सार्वजनिक स्वच्छता, आरोग्यपूरक

## १.१ पार्श्वभूमी

शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) सार्वजनिक स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता तसेच आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याची सवय आणि आरोग्यपूरक स्वच्छता यावर लक्षणीय भर आहे. जागतिक स्तरावर असे दिसून आले आहे की अधिक चांगली सार्वजनिक स्वच्छता, आरोग्यपूरक स्वच्छता आणि वैयक्तिक स्वच्छता तसेच आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याची सवय याची निरनिराळे आजार पसरविणाऱ्या जीवापासून होणारे रोग, परजीवी संसर्ग आणि पोषक घटकांची कमतरता यांच्या प्रभावी नियंत्रणात मदत करते. श्वसनाचे विकार, गॅस्ट्रोइंटेस्टाइनल रोग (विशेषतः अतिसार), मनोवैज्ञानिक समस्या आणि असोशी (ॲलर्जी) यांचा वैयक्तिक स्वच्छता तसेच सभोवताल स्वच्छता ठेवण्याच्या सवयीमुळे कमी होतात असे अभ्यास झाले.

दशके आधी महात्मा गांधी म्हणाले, 'स्वच्छता ही राजकीय स्वातंत्र्यापेक्षा अधिक महत्वाची आहे'. भारताचे पंतप्रधान मा. श्री नरेंद्र मोदी यांनी दि. २ ऑक्टोबर २०१४ रोजी सुरु केलेल्या स्वच्छ भारत अभियान ही देशासाठी ऐतिहासिक घटना ठरली. या अभियानामुळे स्वच्छतेचा विषय केवळ शासनाच्या विकासात्मक धोरणाच्या केंद्रस्थानी आला असे नाही तर पंतप्रधानांच्या लाल किल्ल्यावरून झालेल्या या प्रसंगी भाषणामुळे स्वच्छतेचा संदेश सर्वदूर पोहोचला. स्वच्छ भारत अभियान (नागरी)ची तीन प्रमुख उद्दिष्टे होती: (अ) १००% हागणदारी मुक्त (ओडीएफ) हा दर्जा प्राप्त करणे, (ब) १००% शास्त्रीय घनकचरा व्यवस्थापनाची सुनिश्चिती करणे आणि (क) सर्व वैधानिक शहरांमध्ये २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत 'जनआंदोलना'च्या माध्यमातून वर्तन बदल. अभियानाचा परिव्यय रु. ६२,००९ कोटी एवढा होता, ज्यामध्ये भारत सरकारच्या रु. १४,६२३ कोटींचा हिस्सा होता, आणि राज्याचा किमान हिस्सा रु. ४,८७४ कोटी होता. बाकीचा निधी (रु. ४२,५३५ कोटी) वैयक्तिक लाभार्थीचे योगदान, सार्वजनिक खासगी भागीदारी (PPP) आणि अन्य स्त्रोत यांच्याद्वारे निर्माण केला जाणार होता.

## १.२ यशस्वी कामगिरी

समाजातील सर्व वर्गातील नागरिकांच्या भरीव सहभागाने या अभियानाने वरील उद्दिष्टांच्या बाबतीत लक्षणीय यश मिळविले आहे.



### १.२.१ घनकचरा व्यवस्थापनामधील भारताचा प्रवास

स्वच्छ भारत अभियान सुरू होण्यासोबत जाहीर करण्यात आलेले २०१६चे घनकचरा व्यवस्थापनाविषयीचे नियम, बांधकाम व पाड काम कचऱ्याचे नियम, प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापनाचे नियम इत्यादींनी एकत्रितपणे भारतासाठी प्रभावी घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रगतीचा वेग वाढविण्याचा टप्पा निश्चित केला. २०१४ पूर्वी ज्या ठिकाणी शहरी भागात कचऱ्याचे गचाळ ढीग साचले होते तेथे नागरिकांच्या आरोग्याचा नाश होणे ही एक सामान्य गोष्ट होती. आज त्यामध्ये लक्षणीय सुधारणा झाल्या आहेत. घरोघरी जाऊन घरगुती तसेच अन्य घनकचरा संकलित करणाऱ्या २.५ लाखांहून अधिक वाहनांच्या ताफ्यामुळे शहरे अधिक स्वच्छ झाली आहेत. कचरा स्त्रोताच्या ठिकाणी वेगळा करणे, ज्याचे प्रमाण पूर्वी नगण्य होते, त्याचे महत्व आता नागरिकांना पटले आहे आणि अधिकाधिक घरांकडून त्याचा अवलंब केला जात आहे. कचऱ्याचे मूल्यवर्धित उत्पादनांमध्ये (Value Added Product) रूपांतर करण्यास प्रोत्साहन

देण्यासाठी धोरणात्मक सुधारणांद्वारे सक्षम इकोसिस्टिम म्हणजेच परिसंस्था तयार करण्यात आली आहे. स्रोताच्या ठिकाणी कचरा वेगळे करणे, बांधकाम आणि पाडकाम कचऱ्याचे प्रभावी व्यवस्थापन, एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लॅस्टिकचा कमी वापर इत्यादींसारख्या गंभीर मुद्द्यांविषयीही जागरूकता निर्माण झाली आहे.



ह्या सुधारणांचे सकारात्मक परिणाम सर्वांना दिसत आहेत. अभियानाच्या शुभारंभाच्या वेळी, नगरपालिका घनकचरा प्रक्रिया क्षमता दररोज २६,००० मेट्रिक टन कचरा (१८%) एवढी होती. गेल्या ७ वर्षात यात लक्षणीय वाढ झाली असून सध्या, कचरा प्रक्रिया क्षमता जवळपास दररोज १ लाख मेट्रिक टन (७०%) एवढी आहे. २०१४ मध्ये दारोदार जाऊन संकलन आणि स्त्रोताच्या ठिकाणी कचरा वेगळा करणे हे नगण्य पातळीवरून अनुक्रमे ८६,२२८ प्रभागांपर्यंत (९७%) आणि ७२,४९३ (८५%) प्रभागांपर्यंत पोहोचले आहे. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना, विशेषत: शहरी गरीब समुदायातील महिला बचत गट सदस्यांना उपजीविकेचे अधिक पर्याय आहेत आणि ९०,००० पेक्षा अधिक अनौपचारिक कचरा (संकलन करणाऱ्या) कामगारांना कचरा व्यवस्थापन मूल्य साखळीमध्ये औपचारिक स्थान देण्यात आले आहे.

## १.२.२ भारताचा हागणदारी मुक्ततेचा प्रवास

शहरी भारत स्वच्छ भारत अभियान - नागरी अंतर्गत हागणदारी मुक्त झाला आहे: महात्मा गांधींच्या दूरदृष्टीला समर्पक श्रद्धांजली ठरते. या मोहिमेचे सार्वजनिक स्वच्छतेचे उद्दिष्ट तर पूर्ण झालेच, पण लाखो नागरिकांना, विशेषत: स्त्रियांना सन्मान आणि सुरक्षितता आणि आजार पसरविणारे प्राणी किंवा किटक (Vector borne disease) यांच्यामुळे होणाऱ्या रोगांमध्ये लक्षणीय घट झाली असून परिणामी आरोग्याच्या निर्देशांकांमध्ये सुधारणा अनुभवास आली आहे. ज्यामुळे शहरी भारत सर्वांगीण स्वच्छतेच्या दिशेने वाटचाल करत आहे. ज्यांच्याकडे पूर्वी मोठ्या प्रमाणात दुर्लक्षित होते ते स्वच्छता कर्मचारी आणि सफाई मित्र अभियानचा एक प्रमुख भागधारक बनले आहेत. त्यांच्यासाठी सुरक्षित, निरोगी आणि अधिक चांगल्या राहणीमानाची सुनिश्चित करण्यासाठी उपक्रम राबविले जात आहेत आणि त्यांना उपजीविकेचे चांगले




पर्याय, प्रतिष्ठा आणि आदर प्रदान केला जात आहे. मूर्त परिणामांच्या दृष्टीने, ३५ राज्ये/ केंद्रशासित प्रदेशांमधील सर्व नागरी भाग हागणदारी मुक्त (ODF) (पश्चिम बंगालमधील १ नागरी स्वराज्य संस्था वगळता), म्हणजे ४,३७१ नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (४३७२ पैकी) हागणदारी मुक्त बनल्या आहेत. ६६.८६ लाख वैयक्तिक घरगुती शौचालये (११३% प्रगती) आणि सामुदायिक/ सार्वजनिक (CT/PT) शौचालयांतील ६.४ लाख आसने (१२६% प्रगती) यांच्या बांधकामाद्वारे (बांधकाम सुरू असलेल्यांसह) हे साध्य केले गेले आहे.



### १.२.३ त्रयस्थ संस्थेकडून मूल्यांकन व प्रमाणित प्रोटोकॉल

हागणदारी मुक्त हा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी आणि त्यामध्ये कोणतीही घसरण होऊ नये यासाठी MoHUA ने ओडीएफ+ आणि ओडीएफ++ प्रोटोकॉल सादर केले आहेत. ओडीएफ+ प्रोटोकॉल सामुदायिक/सार्वजनिक शौचालयांच्या दुरुस्ती आणि देखभालीवर (O&M) त्यांची कार्यक्षमता आणि सातत्याने वापरण्यासाठी योग्य देखभाल याच्या सुनिश्चितीतून लक्ष केंद्रित करते. ओडीएफ++ प्रोटोकॉलमध्ये शौचालयातील मैलाचे सुरक्षित उपसा, प्रतिबंधीत वाहतूक आणि प्रक्रिया यावर लक्ष केंद्रित केले आहे आणि उघड्या नाल्यांमध्ये, जलसाठ्यात किंवा मोकळ्या शेतात कोणतीही प्रक्रिया न मैलापाणी सोडला जाऊ नये याची खात्री केली आहे. वॉटर + (Water+) प्रोटोकॉल हे सुनिश्चित करण्यास मदत करते की कोणतीही प्रक्रिया न केलेले सांडपाणी मोकळ्या वातावरणात किंवा जलसाठ्यात सोडले जात नाही. २ ऑक्टोबर २०२१ पर्यंत त्रयस्त संस्थेने केलेल्या पडताळणीनुसार ३,३०९ शहरांना ओडीएफ+ असे प्रमाणित करण्यात आले आहे, ९६० शहरांना ओडीएफ++ असे प्रमाणित करण्यात आले असून,९ शहरे वॉटर + प्रमाणित झाली आहेत.




### १.२.४ जन आंदोलनाच्या माध्यमातून वर्तणूक परिवर्तन

स्वच्छ भारत अभियान-नागरी हा जगातील सर्वात मोठा शहरी सार्वजनिक स्वच्छतेशी संबंधित वर्तवणूक परिवर्तन कार्यक्रम म्हणून उदयास आला आहे आणि सर्वांसाठी पाणी आणि सार्वजनिक स्वच्छतेची उपलब्धता तसेच शाश्वत व्यवस्थापन सुनिश्चिती या दिशेने भारताच्या प्रगतीला गती देऊ शकला आहे (शाश्वत विकास उद्दिष्टे ६). स्वच्छ भारत अभियान - नागरी याच्या अंतर्गत सार्वजनिक स्वच्छतेविषयीच्या चर्चेला देशाच्या विकाससंबंधीच्या विषयांच्या केंद्रस्थानी आणले गेले आहे आणि सरकारी आदेशाचे 'जनआंदोलना' मध्ये रूपांतर करण्यास मदत



झाली आहे. पंतप्रधानांच्या वैयक्तिक नेतृत्वाच्या आणि सहभागाच्या माध्यमातून स्वच्छ भारत अभियानाला सार्वजनिक स्वच्छतेविषयीच्या चर्चेला 'जनआंदोलन' या लोकचळवळीत



समाविष्ट करण्यात यश आले आहे. मोठ्या प्रमाणातील मीडिया मोहीम, सखोल आउटरीच प्रोग्रॅम्स, माहिती, शिक्षण आणि प्रसार (IEC) निधीच्या विनिमयावर कडक देखरेख, सेलिब्रिटी ब्रँड अॅम्बॅसिडर्स आणि प्रभावकांसह अनेक भागधारकांचा सहभाग हे त्याच्या वर्तवणूक परिवर्तन धोरणाचे आधारस्तंभ ठरले आहेत. तथापि, वर्तन बदलाचे प्रमुख कारण म्हणजे समाजातील लोकांनी वास्तविक बदल घडवून आणण्यासाठी आणि ते टिकवून ठेवण्यासाठी स्वत:हून स्वीकारलेली जबाबदारी. पारंपारिक, डिजिटल, सोशल मीडिया मोहिमा आणि सखोल आंतरवैयक्तिक संप्रेषणाच्या विवेकी वापराद्वारे, स्वच्छ भारत अभियान -नागरी हे समाजातील स्वयंसेवक, युवक, विद्यार्थी, गृहिणी, ज्येष्ठ नागरिक, सेलिब्रिटीज्, निवडून आलेले प्रतिनिधी, माध्यमे आणि औद्योगिक क्षेत्र या सर्व वर्गातील नागरिकांना सक्रिय करण्यात यशस्वी झाले आहे. आजवर २० कोटींहून अधिक नागरिक या मोहिमेशी जोडले गेले आहेत, जी सुरू करण्यात आलेल्या *'जनआंदोलना'ची* साक्ष आहे.

## १.२.५ नावीन्यपूर्ण बाबी

खाली दिल्यानुसार अभियानाच्या पहिल्या टप्प्यातील यशाला विविध प्रकारच्या नवकल्पनांचा हातभार लागला आहे.

### १.२.५.१ स्वच्छ सर्वेक्षण:

स्वच्छ भारत अभियान -नागरी अंतर्गत MoHUA ने केलेल्या नावीन्यपूर्ण सर्वेक्षणानुसार शहरांना सार्वजनिक स्वच्छता आणि वैयक्तिक तसेच सभोवतालची स्वच्छता राखण्याच्या सवयी यांच्या विविध निर्देशकांनुसार दर्जा /क्रमवारी देण्यात येते. 'स्वच्छता' संकल्पनेकडे उत्तम स्पर्धेच्या भावनेने शहरांचे उत्साह उंचावण्यास हे सर्वेक्षण यशस्वी झाले आहे. स्वच्छ सर्वेक्षण आता जगातील सर्वात मोठ्या शहरी स्वच्छता सर्वेक्षणांपैकी एक म्हणून उदयास आले असून यामध्ये कोट्यवधी नागरिक सहभागी झाले आहेत. २ ऑक्टोबर २०२१ पर्यंत सर्वेक्षणाच्या ६ फेऱ्या घेण्यात आल्या आहेत, ज्यात इंदूरला सलग चार वर्षे सर्वात स्वच्छ शहर म्हणून घोषित केले गेले आहे. आता ७ वी फेरी जाहीर करण्यात आली असून, तिची लवकरच सुरुवात होणार आहे.

### १.२.५.२ कचरामुक्त शहरांसाठी स्टार रेटिंग प्रोटोकॉल:

घनकचरा व्यवस्थापनच्या विविध निर्देशकांवर आधारित प्रोटोकॉलनिर्देशक स्मार्ट फ्रेमवर्कचे अनुसरण करतात- फ्रेमवर्क जे सिंगल मेट्रिक, मोजता येण्याजोगे , साध्य करता येण्याजोगे, कडक पडताळणी यंत्रणा आणि निष्पत्ती केंद्रित आहे. निर्देशांकांमध्ये घनकचरा व्यवस्थापनचे सर्व घटकांचा समावेश आहे, जसे की स्रोताच्या ठिकाणी विलगीकरण, कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया, कचरा टाकण्याच्या ठिकाणी पर्यावरणाची हानी होणार नाही याकरिता उपाययोजना(Dumpsite remediation), कचरा टाकल्याबद्दल तिथल्या तिथे दंड, मोठ्या प्रमाणात कचरा निर्मात्यांद्वारे अनुपालन, नाल्यांची तसेच जलसाठ्यांची स्वच्छता, प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन आणि बांधकाम आणि पाडकाम कचऱ्याचे व्यवस्थापन इत्यादी बाबी या शहरांना कचरा मुक्त हा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. आजपर्यंत ६ शहरांना ५-स्टार, ८६ शहरांना ३-स्टार आणि ६५ शहरांना १-स्टार म्हणून दर्जा देण्यात आला आहे.

### १.२.५.३ नागरिक आयसीटी (ICT) उपक्रमांच्या माध्यमातून जोडले जातात:

- MoHUA ने गूगल नकाशांवर (Google Map) सर्व सार्वजनिक शौचालये दाखविली जावीत यासाठी गूगलासोबत भागीदारी केली आहे, ज्याद्वारे नागरिकांना सार्वजनिक स्वच्छतेच्या सुविधा सहजपणे मिळविणे अधिक सुलभ होईल. आजपर्यंत, ३,१०० पेक्षा अधिक शहरांमधील ६५,५०० पेक्षा अधिक सार्वजनिक शौचालये भारताच्या ७०% पेक्षा जास्त शहरी लोकसंख्येला गूगल नकाशांद्वारे उपलब्ध आहेत.
- कोटींहून अधिक नागरिकांनी स्वच्छता ॲप (सार्वजनिक स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाशी संबंधित सर्व तक्रारी करिताचा निवारण कक्ष/प्लॅटफॉर्म) डाउनलोड केले आहे. जवळपास २.२२ कोटी तक्रारी नोंदविण्यात आल्या असून ९० टक्क्यांहून अधिक प्रमाणासह २.०८ कोटी तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे.



- MoHUA ने संपूर्ण भारतात नगरपालिका कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी ई-लर्निंग प्लॅटफॉर्म तैनात केला आहे. या प्लॅटफॉर्मवर सार्वजनिक स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन याबाबतच्या विविध विषयांवर १७५ हून अधिक मॉड्यूल्स उपलब्ध आहेत. ९०,००० हून अधिक नगरपालिका कर्मचारी आणि इतर वापरकर्ते यांनी या प्लॅटफॉर्मचा सक्रियपणे वापर केला आहे आणि ८.८ लाखाहून अधिक प्रमाणपत्रांची यशस्वीरित्या पूर्तता केली आहेत (सरकारी कर्मचाऱ्यांच्या ७.५६ लाख प्रमाणपत्र पूर्ततेसह).



**१.२.५.४ स्वच्छता हे प्रत्येकाचे काम बनले आहे:**

'स्वच्छता' हे प्रत्येकाचे काम बनविण्यासाठी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून सेलिब्रिटी, समाजातील प्रभावक, औद्योगिक भागीदार आणि कॉर्पोरेट संस्थांशी भागीदारी, तसेच सामाजिक उद्योजक, नागरिक, विद्यार्थी आणि युवक, महिला बचत गट, गृहिणी आणि ज्येष्ठ नागरिक अशांसारख्या विविध प्रकारच्या भागधारकांशी अभियान जोडले होते.

**१.२.५.५ नि:पक्षपातीपणा, सर्वसमावेशकता, विशेष गरजांची पूर्तता:**



या मोहिमेचे फायदे प्रत्येक नागरिकाला समन्यायी आणि सर्वसमावेशक पद्धतीने मिळावेत यासाठी प्रमाणित प्रोटोकॉल लागू करण्यात आले. उदाहरणार्थ, ओडीएफ+ प्रोटोकॉलमध्ये प्रत्येक सामुदायिक/सार्वजनिक (CT/PT) शौचालयामध्ये स्त्री, पुरुष (स्वतंत्र इ.) अनुकूल, बालस्नेही, दिव्यांग-अनुकूल अशा अनिवार्य वैशिष्ट्ये निर्देशित करण्यात आली आहेत. या प्रोटोकॉल्सनी गूगल नकाशांवर सर्व सामुदायिक/सार्वजनिक शौचालयांचे मॅपिंग करण्याबरोबरच कोणीही मागे न राहता सर्व नागरिकाच्या गरजा पूर्ण होतील याची खात्री केली.

## १.३ स्वच्छ भारत अभियान २.० ची आवश्यकता:

NSSO ने २०१८ मध्ये मिशनचे निःपक्षपाती मूल्यांकन केले होते. ७६व्या फेरीच्या अहवालात (पिण्याच्या पाण्यासह, सार्वजनिक स्वच्छता, आरोग्यपूरक स्वच्छता आणि भारतातील गृहनिर्माण परिस्थिती: जुलै - डिसेंबर २०१८) या अभ्यासात असे आढळले की शहरी भागात ९८% शौचालये वापरली जात आहेत. शिवाय, नीती (NITI) आयोगाने १८ जानेवारी २०२१ रोजीच्या अहवालात स्वच्छ भारत अभियान - नागरी यासह विविध केंद्र पुरस्कृत योजनांचे मूल्यांकन केले आहे. त्याच्या शिफारशींमध्ये खालील बाबींचा समावेश आहे:

अ) वैयक्तिक घरगुती शौचालये आणि सामुदायिक/सार्वजनिक शौचालयांमध्ये सतत गुंतवणूक करण्याची आवश्यकता;

ब) सर्वसमावेशक सार्वजनिक स्वच्छतेसाठी सार्वजनिक स्वच्छतेच्या संपूर्ण मूल्य साखळीवर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे, ज्यात मैला आणि सांडपाण्याचे संकलन, प्रतिबंध, प्रक्रिया, विल्हेवाट आणि पुनर्वापर यांचादेखील समावेश आहे;

क) विविध प्रकारच्या घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची गरज (प्लॅस्टिक, बांधकाम आणि पाडकामातून निर्माण होणाऱ्या तसेच सॅनिटरी कचऱ्यासह);

ड) वर्षानुवर्षे पडून असणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी निधीची गरज, प्लॅस्टिक कचरा, बांधकाम आणि पाडकाम कचरा याचे व्यवस्थापन.




इतर गोष्टींसह, अभियान चालू ठेवण्याची गरज वरील शिफारशी सूचित करतात.

शिवाय, पुरेशा संरचना आणि त्यांची अंमलबजावणी यांच्या निर्मितीला कित्येक पटींनी चालना देऊन स्वच्छ भारत अभियान - नागरीला मिळालेले यश दीर्घकाळ टिकून राहणे आवश्यक आहे.

म्हणूनच, खालील बाबींवर लक्ष केंद्रित करून स्वच्छ भारत अभियान - नागरी २.०ची आवश्यकता आहे:

"कचरामुक्त" शहरी भारताची संकल्पना प्राप्त करण्यासाठी, बांधकाम आणि पाडकामातून निर्माण होणारा कचऱ्याचे प्रभावी व्यवस्थापन, एकदाच वापरता येणाऱ्या प्लॅस्टिकमध्ये कपात करण्यासह प्लॅस्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन आणि वर्षानुवर्षे कचरा पडून असणारी कचरा टाकण्याची सर्व ठिकाणे यांवर उपाययोजना करणे यासह स्रोताच्या ठिकाणी विलगीकरण, संकलन आणि प्रक्रिया यासारख्या मुद्द्यांवर अधिक लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे;

- ओडीएफ दर्जा टिकवून ठेवण्यासाठी आणि घसरण

टाळण्यासाठी, मैला व सांडपाणी सुरक्षितपणे सामावून घेणे, वहन, त्यावर प्रक्रिया करणे आणि त्याची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे, जेणेकरून प्रक्रिया न केलेला मैला किंवा सांडपाणी जमिनीला किंवा जलसाठ्यांना प्रदूषित करत नाही;

- अभियानाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी नागरिकापर्यंत पोहोचणे आणि जनआंदोलन,तसेच सर्व संबंधित भागधारकांची क्षमता बांधणी आणि कौशल्यवर्धनाद्वारे माहिती, शिक्षण आणि संप्रेषण तसेच वर्तवणूक परिवर्तन यावर तीव्र लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

**१.४** उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी, 'स्वच्छ' वर्तन संस्थात्मीकरण आणि ते शास्वत राहावे यासाठी म्हणून अभियानचा कालावधी आता ५ (पाच) वर्षांकरिता १ ऑक्टोबर २०२१ ते १ ऑक्टोबर २०२६ असा स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० म्हणून वाढविण्यात आला आहे, . शाश्वत विकास उद्दिष्टे (SDG) २०३०च्या यशात योगदान देण्यासाठी भारत सरकार राज्ये/ केंद्रशासित प्रदेश आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या भागीदारीतून स्वच्छ भारत अभियान -नागरी २.० या अंतर्गत सर्व शहरे 'कचरामुक्त' करण्यासाठी वचनबद्ध आहे, ज्यामुळे सरतेशेवटी शहरी लोकसंख्येच्या जीवनाचा दर्जा आणि त्याची सुलभता सुधारेल आणि अशा प्रकारे शहरी परिवर्तन होईल.

स्वच्छ भारत अभियान -नागरी २.० याची MoHUA द्वारे राज्ये/ केंद्रशासित प्रदेश यांच्या माध्यमातून सर्व वैधानिक शहरांमध्ये (२०११च्या जनगणनेनुसार, आणि त्यानंतर त्यामध्ये भर पडलेल्या वैधानिक शहरांनुसार) या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अंमलबजावणी केली जाईल.

# प्रकरण २ - थोडक्यात स्वच्छ भारत अभियान-नागरी २.०

**"कचरामुक्त" शहरी भारत निर्माण करण्याचे अभियानाचे ध्येय साध्य करण्याकरिता सर्वांगीण दृष्टिकोन निश्चित करणे.**

स्वच्छ भारत अभियान मधील घटक, निधी उपलब्धता आणि मार्गदर्शक तत्वे खालीलप्रमाणे.

## २.१ मिशन : एकंदरीत दृष्टीकोन आणि उद्दिष्टे

सर्व शहरांकरिता **"कचरामुक्त"** दर्जा प्राप्त करण्याचे ध्येय ठेवून स्वच्छ भारत अभियान - नागरी २.० ची अंमलबजावणी केली जाईल. यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश असेल:

सर्व शहरांकरिता "कचरामुक्त" दर्जा प्राप्त करण्याचे ध्येय ठेवून स्वच्छ भारत अभियान - नागरी २.० ची अंमलबजावणी केली जाईल. यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश असेल:

- सर्व घरे आणि परिसरातील व्यक्ती त्यांच्या कचऱ्याचे "ओला कचरा" (स्वयंपाकघर आणि बागांमधील) आणि "सुका कचरा" (कागद, काच, प्लॅस्टिक आणि घरगुती घातक कचरा यांसह स्वतंत्रपणे वेष्टनात टाकलेला सानिटरी नापकीन कचरा) असे वर्गीकरण करतील;
- प्रत्येक घरातून/ परिसरातून वर्गीकरण केलेल्या कचऱ्याचे १००% संकलन केले जाईल.
- सर्व प्रकारच्या कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने १००% व्यवस्थापन आणि क्षेपणभूमीत शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावली जाईल.
- कचरा डेपोंमध्ये वर्षानुवर्षे साचून राहिलेल्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावून तेथे हरित पट्टे निर्माण केले जातील.
- शौचालयांतील मैल्याचे / वापरलेल्या पाण्याचे व्यवस्थापन; सुरक्षित वाहतूक, शास्त्रोक्त प्रक्रिया करणे जेणे करून आसपासची जमीन, जलसाठे, भूजल इ. प्रदूषित होणार नाहीत हे ध्येय साध्य करण्याकरिता खालील प्रमाणे उद्देष्ट ठेवले आहे.

अ) शाश्वत घनकचरा व्यवस्थापन

१. शहरातील घनकचऱ्यावर १००% वैज्ञानिक प्रक्रिया करून सर्व शहरे स्वच्छ आणि कचरामुक्त राहतील याची सुनिश्चिती करणे;

२. घनकचरा व्यवस्थापन प्रक्रियेमधून निर्माण होणारे वायू प्रदूषण कमी करणे;

३. एकदा वापरून टाकून देण्याच्या (एकल वापर) प्लॅस्टिकच्या वापरात टप्प्याटप्प्याने कपात करणे.

ब) वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया व शाश्वत व्यवस्थापन

१. मैलायुक्त वापरलेल्या पाण्याची सुरुवातीपासून ते शेवटपर्यंतच्या सर्व उपायांसह संपूर्ण शास्त्रोक्त प्रक्रिया करणे. (उत्सर्जन, प्रतिबंध, शुद्धीकरण, वाहतूक यांपासून ते शौचालयांमधील सर्व सांडपाण्याची सुरक्षित विल्हेवाट करणे पर्यंत);

२. जलसाठ्यांमध्ये सोडण्यापूर्वी वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया१ , आणि प्रक्रिया केलेल्या पाण्याचा जास्तीत जास्त पुनर्वापर करणे;

३. गटारे व सेप्टिक टँक्समध्ये प्रादुषके धोकादायकपणे मिसळण्याला प्रतिबंध करणे आणि गटारे व सेप्टिक टँक स्वच्छतेच्या कामांचे यांत्रिकीकरण करून मानवी हाताने मैला हाताळण्यावर कायमस्वरूपी बंदी घालणे;

क) प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचून, 'जनआंदोलन' त रूपांतरण करण्याकरिता जनजागृती करणे, आणि 'स्वच्छ वर्तनासाठी संस्थात्मक बांधणी करणे.

ड) अभियानाची उद्दिष्टे साध्य करण्याकरिता पद्धतशीर उपाययोजना प्रभावीपणे अमलात आणण्याकरिता संस्थात्मक क्षमता निर्माण करणे.

## २.२ उप घटक निहाय निधीची तरतूद

### २.२.१ शाश्वत घनकचरा व्यवस्थापन

***उद्दिष्ट: शहरातील घनकचऱ्यावर १००% वैज्ञानिक प्रक्रिया करून सर्व शहरे स्वच्छ आणि कचरामुक्त करणे.***

निधीसाठी पुढील घटक पात्र असतील:

- कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या सुविधा जसे की एमआरएफ/ (मटेरिअल्स रिकव्हरी फॅसिलिटी,) वाहतूक केंद्रे, कंपोस्ट खत प्रकल्प, बायो मिथेनेशन प्रकल्प, आरडीएफ/ (रीफ्युज्ड डीराइव्ह्ड फ्युएल) प्रक्रिया सुविधा, प्लास्टिक कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची सुविधा, कचऱ्यापासून वीजनिर्मिती, सॅनिटरी लँडफिल / पर्यावरणाला धोका न पोचविता कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्याच्या जागा) इत्यादींची उभारणी.
- झाडलोट करणारी यांत्रिक उपकरणे खरेदी करणे आणि बांधकाम पाडकाम यातून निर्माण होणारा कचऱ्यावर (सी आणि डी वेस्ट) प्रभावी व्यवस्थापन करण्याकरिता प्रक्रिया सुविधा उभारणे (१५४ शहरांमध्ये - परिशिष्ट १मध्ये दिलेल्या यादीनुसार)
- स्थानिक स्वराज्य संस्थांमधील वर्षानुवर्षे पडून असणाऱ्या कचऱ्यावर बायो रेमिडीयेशन/ कॅप्पिंग करणे.

*टीप: सध्या अस्तित्वात असलेल्या प्रणालींच्या आधुनिकीकरणासह प्राथमिक संकलन आणि वाहतूक (सी आणि टी) यंत्रणा उभारण्यासाठीच्या खर्चाकरिता केंद्र सरकारकडून कोणताही निधी उपलबद्ध होणार नाही.*

### २.२.२ शाश्वत स्वच्छता

***उद्दिष्ट: सर्व वैधानिक शहरांचा हागणदारीमुक्त दर्जा टिकवून ठेवणे.***

निधीकरिता पुढील घटक पात्र आहेत: (१) वैयक्तिक घरगुती शौचालयांचे (आयएचएचएल) बांधकाम, (२) सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाच्या (सीटी आणि पीटी) आसनांचे बांधकाम आणि (३) अस्वच्छ शौचालयांच्या सुधारणेसह मुताऱ्यांचे बांधकाम.

### २.२.३ वापरलेल्या पाण्याचे व्यवस्थापन

उद्दिष्ट: एक लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या सर्व शहरांमध्ये प्रक्रिया न केलेला मैलायुक्त गाळ किंवा वापरलेले पाणी पर्यावरणामध्ये सोडले जात नाही आणि वापरलेले सर्व पाणी (गटारे आणि सेप्टेज/मैलायुक्त पाणी, स्वयंपाकघरात वापरलेले पाणी आणि सांडपाणी) सुरक्षितपणे साठवले जाते, वाहून नेले जाते आणि त्यावर प्रक्रिया केली जाते तसेच प्रक्रिया केलेल्या सदर वापरलेल्या पाण्याचा जास्तीत जास्त पुनर्वापर केला जातो याची सुनिश्चिती करणे.

निधीकरिता पुढील घटक पात्र असतील:

- सर्व सेप्टिक टँकमधून नियोजित आणि आवश्यकतेनुसार मैल्याचा गाळ काढण्याकरिता डीस्लजिंग उपकरण.
- जवळच्या मलनिस्सारण यंत्रणेला जोडणाऱ्या शेवटच्या टप्प्यातील व्यवस्थेसह
- वापरलेल्या / मैलायुक्त पाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता एसटीपी / एफएसटीपी बांधणे.

### २.२.४ आयईसी (माहिती शिक्षण संप्रेषण)/ बीसीसी(वर्तन बदलाची माहिती

***उद्दिष्ट: मोठ्या जनसमुदाया पर्यंत पोहोचून,' जनआंदोलनाची' तीव्रता वाढविण्याकरिता जनजागृती करण्याची आणि "कचरामुक्त" शहरांचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने 'स्वच्छ' वर्तन बिंबविण्याची आणि त्याच्याशी संबंधित कामे करण्याची सुनिश्चिती करणे.***

निधीकरिता पुढील घटक पात्र असतील:

अ) राष्ट्रीय स्तर - आयईसीच्या एकूण निधीपैकी काही भाग गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालय यांच्याकडून पुढील गोष्टींकरिता राखून ठेवला जाईल:

१) आयईसीची धोरणे, आनुषंगिक गोष्टी, मजकूर आणि साधने विकसित करण्यासाठी आणि सोशल मीडियाशी संपर्क प्रस्थापित करण्यासाठी व्यावसायिक आयईसी/ बीसीसी एजन्सी (आउटसोर्सिंग तत्त्वावर) ची नेमणूक करणे;

२) स्वच्छ भारत अभियान नागरीच्या विविध घटकांसंदर्भात राष्ट्रीय स्तरावरील मोहिमांचा प्रसार;

३) स्वच्छ सर्वेक्षण, ओडीएफ+/ ओडीएफ++/ वॉटर+ आणि कचरामुक्त प्रशस्तीपत्रे इत्यादी राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांना प्रोत्साहन देणे;

४) कचरामुक्त भारताचा प्रचार करण्याकरिता राष्ट्रीय स्तरावरील लोककेंद्रित कार्यक्रमांचे आयोजन

ब. राज्य/ यूएलबी स्तर: - शिल्लक निधी राज्य/यूएलबी (नागरी स्थानिक स्वराज्य संस्था) येथे वापरला जाऊ शकतो:

१) स्वच्छ भारत अभियान - नागरी २.०च्या विविध घटकांसंदर्भात राज्य/ स्थानिक स्वराज्य संस्था स्तरावरील मोहिमांचा प्रचार प्रसार, ज्यामध्ये परस्पर संवादाचा समावेश होतो.

२) स्वच्छ भारत अभियान -नागरी २.० संदर्भात तळागाळातील लोकांना एकत्र करण्याकरिता आणि त्यांचे संवेदीकरण करण्याकरिता स्वयंसेवी संस्था/ सीबीओ / सीएसओ (सामाजिक संस्था) यांना सामावून घेवून त्यांची नियुक्ती करणे;

३) घरगुती/ वैयक्तिक पातळी, सामूहिक उद्योग, रेसिडेंट वेलफेअर असोसिएशन्स, शाळा/ महाविद्यालये, बाजार संघटना इ. स्तरावर चांगल्या पद्धतींना प्रोत्साहन देणे;

४) स्वच्छ भारत अभियान -नागरी २.०शी संबंधित प्रचार कार्यक्रमांचे आयोजन करणे (जसे की 'प्लॉग' रन्स, मास ट्रिगरिंग ॲक्टिव्हिटी, स्पर्धा इ.).

### २.२.५ क्षमताबांधणी

***उद्दिष्ट: अभियानाची उद्दिष्टे साध्य करण्याकरिता पद्धतशीर उपाययोजना प्रभावीपणे अमलात आणण्याकरिता संस्थात्मक क्षमता तयार करणे.***

निधीकरिता पुढील घटक पात्र असतील:

अ) राष्ट्रीय स्तर - क्षमताबांधणीकरिता असलेल्या एकूण निधीपैकी काही भाग गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालय यांच्याकडून पुढील बाबींकरिता राखून ठेवला जाईल:

- सेंटर ऑफ एक्सलन्स (सीओई) ची स्थापना करणे ;
- निवडक शैक्षणिक संस्था आणि कौशल्याच्या निवडक क्षेत्रांमध्ये चेअर प्रोफेसर पदांना निधी देणे;
- पीएचई अधिकारी व गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालया च्या तांत्रिक कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण
- राज्ये/ केंद्रशासित प्रदेश आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना मार्गदर्शन आणि क्षमताबांधणीमध्ये मदत करण्यासाठी संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ भागीदारांना नियुक्त करणे, त्यांचे पॅनेल तयार करणे आणि व्यावसायिक संस्थांची नियुक्ती करणे;
- ई-लर्निंग पोर्टलची निर्मिती आणि परिचालन करणे;
- मिशनची सुरळीत अंमलबजावणी करण्यासाठी आयसीटी उपक्रमांचा विकास आणि देखभाल करणे, वापरावयाच्या उत्तम पद्धतींसाठी व्हिडिओ आणि दस्तऐवज तयार करणे, राष्ट्रीय/ परदेशी भेटी देणे इ. साठी तांत्रिक तज्ज्ञ तसेच व्यावसायिक एजन्सी यांची नेमणूक करणे;
- संबंधित तज्ज्ञ समित्यांनी शोधलेल्या नावीन्यपूर्ण प्रयोगांना /स्टार्टअपला निधी देणे (एनएआरसीच्या मान्यतेच्या अधीन)
- कार्यशाळा आणि व्याख्याने आयोजित करणे;
- स्वच्छ सर्वेक्षण, ओडीएफ+/ ओडीएफ++/ वॉटर+ प्रोटोकॉल्स, कचरामुक्त स्टार रेटिंग/ मानांकन प्रोटोकॉल इत्यादींसाठीच्या विषय मूल्यमापन आणि प्रमाणपत्रांसाठी तिऱ्हाईत पक्षाकडून सेवा प्राप्त करणे;
- मिशन मॅनेजमेंट/व्यवस्थापन युनिटची स्थापित (एमएमयू).
- स्वच्छ भारत अभियान - नागरी २.० ला विविध स्तरांवर पाठिंबा देण्यासाठी इंटर्न्सची नियुक्ती करणे.
- स्वच्छता ॲप २.०, स्वच्छ मंच २.० अशांसारखी डिजिटल आउटरीच साधने तयार करणे आणि त्याला साहाय्य करणे;
- आवश्यकतेनुसार कौशल्य विकास उपक्रम हाती घेणे.
- संस्थात्मक क्षमता निर्माण करण्यासाठी आवश्यक इतर उपाययोजना.

ब. राज्य स्तर- निधीकरिता पुढील घटक पात्र असतील:

१) राज्य/ केंद्रशासित प्रदेश स्तरावर प्रोग्रॅम मॅनेजमेंट युनिटची (पीएमयू) नियुक्ती करणे;

२) माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञान (आयसीटी) उपक्रमांसाठी विक्रेते/ एजन्सींची नेमणूक, कामगिरीचे विश्लेषण करणे, सामाजिक लेखापरीक्षण, कार्यशाळा व्याख्याने, एक्सपोजर भेटी इत्यादी आयोजित करणे, ;

३) तरुण व्यावसायिक आणि इंटर्न्स यांना त्यांच्यामधील मानवी संसाधनांमध्ये वाढ करण्यासाठी आणि तरुणांना स्वच्छ भारत अभियान नागरी- २.० सोबत जोडण्यासाठी नियुक्त करणे;

४) तळागाळातील लोकांच्या क्षमता बांधणीकरिता स्वयंसेवी संस्थां/सामाजिक संस्थांची नेमणूक करणे;

५) राज्य/ केंद्रशासित प्रदेश स्तरावर मनुष्यबळाच्या प्रशिक्षणासाठी तांत्रिक संस्थांची नेमणूक करणे.

क) स्थानिक स्वराज्य संस्था स्तर - निधीकरिता पुढील घटक पात्र असतील:

१) तरुण व्यावसायिक आणि इंटर्न्स यांना त्यांच्यामधील मानवी संसाधनांमध्ये वाढ करण्यासाठी आणि तरुणांना स्वच्छ भारत अभियान नागरी- २.०सोबत जोडण्यासाठी नियुक्त करणे;

२) माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञान (आयसीटी) उपक्रमांसाठी विक्रेते/ एजन्सी उपलब्ध करून घेणे, कामगिरीचे विश्लेषण करणे, सामाजिक लेखापरीक्षण, कार्यशाळा व्याख्याने, एक्सपोजर भेटी आयोजित करणे इत्यादी;

३)तळागाळातील लोकांच्या क्षमता बांधणीकरिता स्वयंसेवी संस्था/ सामाजिक संस्थांची नेमणूक करणे.

याची नोंद घेण्यात यावी की एका वर्षाचा प्रशासकीय आणि कार्यालयीन खर्च हा सूचक खर्चाच्या टक्केवारीऐवजी वास्तविक खर्च / प्राप्त परिणाम याचे प्रमाण म्हणून ठेवला पाहिजे.

## २.३ मिशनचा कालावधी

हे मिशन १ऑक्टोबर २०२१ पासून ते १ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पाच वर्षांकरिता चालू राहील.

## २.४ मिशनची व्याप्ती: शहरे आणि लक्ष्य लोकसंख्या

भारतातील सर्व वैधानिक शहरे मिशनमध्ये समाविष्ट केली जातील.

## २.५ मिशनची अंमलबजावणी:

सामंजस्य करार: राज्ये/ केंद्रशासित प्रदेश आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांनी गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालयाबरोबर एका त्रिपक्षीय सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. हा सामंजस्य करार संपूर्ण कचऱ्याची निर्मितीच्या जागेवरच वर्गीकरण, बांधकाम आणि पाडकाम यातून निर्माण होणारा कचऱ्यावर प्रक्रिया, एकल वापर प्लास्टिकची टप्प्याटप्प्याने कपात करण्याबरोबरच वर्षानुवर्षे पडून असणाऱ्या कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून "कचरा मुक्त शहरे" तयार करण्याच्या गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालय, राज्य/ केंद्रशासित प्रदेश आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सामुदायिक हेतूचे प्रतिनिधित्व करतो. गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालय, राज्ये/ केंद्रशासित प्रदेश आणि स्थानिक स्वराज्य संस्था हे सामंजस्य करारानुसार भूमिका आणि जबाबदारी पार पाडतील.

## २.६ मिशनचे धोरण: मार्गदर्शक तत्त्वे

स्वच्छ भारत अभियान नागरी मधून मिळालेल्या अनुभवांचा वापर करून, ""कचरामुक्त" शहरी भारताचे अंतिम उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीने स्वच्छ भारत अभियान नागरी-२.०च्या घटकांची अंमलबजावणी करण्याकरिता पुढील मार्गदर्शक तत्त्वे आणि धोरणे स्वीकारण्याचे प्रस्तावित आहे.

### २.६.१ जन आंदोलन : 'स्वच्छते'च्या केंद्रस्थानी समानता आणि समावेशन

अ) सर्व वर्गातील नागरिकांना सहभागी करून घेऊन अभियानाच्या केंद्रस्थानी आणणे(उदा. महिला आणि गृहिणी, विद्यार्थी आणि तरुण, ज्येष्ठ नागरिक आणि निवृत्त कर्मचारी, धार्मिक नेते, सोशल मीडिया प्रभावक, सेलिब्रिटी आणि ब्रँड ॲम्बॅसिडर्स, बचत गट, बाजारपेठ आणि इतर उद्योग संघटना, आरडब्ल्यूएज्, निवडून आलेले प्रतिनिधी इत्यादी);

ब) सर्व बचत गट, विशेषत: महिलांचे बचत गट, एकतर सरकारी कार्यक्रमांशी संलग्न (उदा. एनयूएलएम/राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान, एनएचएम/राष्ट्रीय आरोग्य मिशन) किंवा अन्यथा, तळागाळात/ सामाजिक स्तरावरील सुलभीकरण आणि स्वच्छ भारत अभियान नागरी- २.० च्या अंतर्गत परस्पर संवाद या उपक्रमांसाठी वापरले जातील;

क) स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाच्या नियोजनापासून ते परिचालन व देखभाल इथपर्यंतच्या विविध टप्प्यांवर महिला नेतृत्वाला प्रोत्साहन दिले जाईल;

ड) स्थानिक स्वराज्य संस्थांनी शहरी गरीब (विशेषत: झोपडपट्टीवासीय) आणि इतर असुरक्षित गटांच्या (ज्येष्ठ नागरिक, मुली, गर्भवती आणि स्तनदा माता, दिव्यांग, तृतीय पंथी लोकांचा गट, स्थलांतरित, बेघर, बांधकाम मजूर इ.) स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन याच्या गरजांवर विशेष लक्ष केंद्रित करायचे आहे;

इ) अभियान अंतर्गत निर्माण केलेल्या सर्व पायाभूत सुविधा, मग ती शौचालये असोत किंवा कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या सुविधा असोत, तसेच सर्वांना मुक्तपणे वावरता यावे याकरिता सर्व समावेशक असणारी आणि दिव्यांगांना अनुकूल अशी वैशिष्ट्ये असलेली कामाची ठिकाणे असणे; २३) अभियानअंतर्गत तयार करण्यात आलेल्या सर्व पायाभूत सुविधा/ मालमत्ता आपत्ती प्रतिरोधक असाव्यात.

ग) स्वच्छ भारत अभियानाच्या पुनर्वापर मूल्य साखळीमध्ये रिसायकलर्स/पुनर्वापरकर्ते आणि स्क्रॅप डीलर्स/भंगार मालाचे व्यावसायिक (औपचारिक आणि अनौपचारिक दोन्ही क्षेत्रे) यांना एकत्रित आणले जावे;

ह) कार्यात्मक परिणामांवर लक्ष केंद्रित करून वर्तन बदलावर सातत्याने लक्ष केंद्रित करणे, (उदा. हागणदारीमुक्तची शाश्वतता, सेप्टिक टँकचे नियमित डीस्लजिंग, सार्वजनिक आणि सामुदायिक शौचालयांमध्ये वैयक्तिक तसेच आसपासच्या परिसराच्या स्वच्छतेची सवय आणि आरोग्यपूरक स्वच्छतेची सुनिश्चिती करणे आणि घरगुती कचऱ्याचे जागेवरच वर्गीकरण करणे);

स्वच्छता कर्मचाऱ्यांची सुरक्षितता आणि कल्याण यांची यांद्वारे सुनिश्चिती करणे,

- सफाईच्या कामाचे यांत्रिकीकरण, स्वच्छता कर्मचाऱ्यांना संरक्षक गिअर/ पीपीई किटची तरतूद इत्यादीद्वारे स्वच्छतेच्या कामासाठी गटारे आणि सेप्टिक टँकमध्ये धोकादायकरित्या उतरण्याला प्रतिबंध करणे;
- नागरिकांना सेप्टिक टँक्सच्या डिस्लजिंग संदर्भातील विनंती/ तक्रारी नोंदवता याव्यात म्हणून हेल्पलाइन क्रमांक सुरू करणे.
- सर्व स्वच्छता कर्मचाऱ्यांना जीवन व आरोग्य विमा यासारख्या सामाजिक कल्याणाचा लाभ घेण्यास सक्षम करणे (औपचारिक, अनौपचारिक आणि कंत्राटी), स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या समूहास पाठिंबा देणे;
- अनिवार्यपणे सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचा समावेश असलेल्या रीस्पॉन्सिबल/जबाबदार स्वच्छता प्राधिकरण (आरएसए) आणि स्वच्छता प्रतिसाद युनिट्सची (एसआरयू) स्थापना करणे.
- 'चॅम्पियन सफाईमित्र' म्हणून मान्यता देऊन सर्व श्रेणीतील स्वच्छता कर्मचाऱ्यांवर विशेष लक्ष केंद्रित केले जावे आणि त्यांच्या कामाला ओळख निर्माण करून देण्यासाठी आणि त्यांना मान्यता देण्यासाठी संस्थात्मक यंत्रणा निर्माण करणे.

### २.६.२ परिणाम घडून येण्याकरिता स्पर्धा: महत्वाकांक्षी जिल्ह्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांवर विशेष लक्ष केंद्रित करून शहरांमधील निरोगी स्पर्धेचे नियोजन करणे:

स्वच्छ भारत अभियान -नागरीमधील स्वच्छ सर्वेक्षणाने हे दाखवून दिले आहे की स्पर्धात्मक निरीक्षणाचा आराखडा हा प्रशासनाचे साधन म्हणून विकसित होत असताना अंमलबजावणीला गती देण्यास कशी मदत करू शकतो. त्याचबरोबर स्वच्छ सर्वेक्षणाच्या वार्षिक मानांकन सर्वेक्षणाद्वारे सतत देखरेख करण्याकरिता आणि महत्वाकांक्षी जिल्ह्यांच्या समावेशासह सर्व नागरिकांना सार्वजनिक स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाची सेवा जलद देण्याकरिता सक्षम होण्यासाठी हा दृष्टिकोन नेहमीच ठेवला जाईल.

### २.६.३ स्वच्छतेची मानके

गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालयाने अनेक प्रमाणित प्रोटोकॉल सादर केले आहेत ज्यामध्ये स्वच्छ भारत अभियान-नागरी अंतर्गत संपूर्ण शहरी भारतात स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनामध्ये प्रमाणित परिणामांची सुनिश्चिती होण्याकरिता कचरामुक्त शहरांसाठी ओडीएफ, ओडीएफ+, ओडीएफ++, वॉटर+ आणि स्टार मानांकन प्रोटोकॉलचा समावेश केला आहे. या प्रोटोकॉलने 'स्वच्छता' या निकषावर शहरांचे मूल्यांकन करण्यासाठी एक प्रमाणित मानक समान आराखडा प्रदान केला आहे आणि शहरे व शहर प्रतिनिधींसाठी मार्गदर्शक दस्तऐवज म्हणून त्याचा उपयोग होत आहे. हे प्रमाणित प्रोटोकॉल (ओडीएफ+, ओडीएफ++, वॉटर+, कचरामुक्त शहरांकरिता स्टार मानांकन प्रोटोकॉल इत्यादी) स्वतंत्र त्रयस्थ संस्थे कडून केलेले मूल्यांकन आणि प्रमाणन यांसह अभियानाच्या परिणामांच्या मानकीकरणासाठी कायम ठेवले जातील.

### २.६.४ क्षमताबांधणी

शाश्वत परिणामांसाठी क्षमता बांधणी करणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना अभियानाशी जोडणे हे खालील प्रमाणे केंद्रित पद्धतीने केले जाईल:

१) तांत्रिक तसेच प्रशासनाच्या विषयांमध्ये संस्थात्मक आणि वैयक्तिक क्षमता निर्माण करण्यासाठी ई-लर्निंग आणि इतर खात्रीशीर माध्यमांचे बळकटीकरण करणे;

२)स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन क्षेत्रात कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करणे.

### २.६.५ भागीदारी

अभियानाच्या परिणामांना प्रत्यक्ष स्वरूपात गती देण्यासाठी तसेच स्वच्छ भारत अभियानाच्या संस्थात्मक क्षमतांना आणि वापरलेल्या पाण्याच्या व्यवस्थापन क्षेत्रामध्ये बळकटी आणण्याकरिता हे अभियान सर्व विकास भागीदार,संबंधित क्षेत्रातील माहीतगार भागीदार, त्या त्या भागातील भागीदार आणि उद्योग यांच्याशी त्यांच्या मदतीचा आणि पाठिंब्याचा लाभ घेण्याकरिता सक्रियपणे जोडलेले असेल.

### २.६.६ डिजिटल सक्षमीकरण

स्वच्छ भारत अभियान-नागरी अंतर्गत आधीच एक महत्वाचे वैशिष्ट्य असलेल्या मजबूत आयसीटी- सक्षम नियंत्रणावर अधिक जोमाने लक्ष केंद्रित केले जाईल, जेणेकरून मालमत्तेचे वास्तविक वेळेत निरीक्षण करणे, त्यांच्या क्षमतेच्या पूर्ण वापराची सुनिश्चिती करणे आणि अभियानाला डिजिटल व पेपरलेस/कागदरहित बनविणे शक्य होईल. कार्यान्वयन टप्प्यामध्ये कार्यक्षमतेच्या निकषांवर वास्तविक वेळेतील माहिती प्रदान करण्यासाठी सर्व प्रकल्प आणि सेवांना डिजिटल साधनांचा वापर करणे अनिवार्य असेल.

### २.६.७ तंत्रज्ञानसंवर्धन, नावीन्य आणि सामाजिक उद्योगांसाठी प्रोत्साहन

“आत्मनिर्भर भारत” आणि “मेक इन इंडिया” ह्या, सरकारच्या दृष्टिकोनाला पुढे नेण्यासाठी हे अभियान संशोधन व विकास यामध्ये गुंतवणूक करून, तंत्रज्ञानाची आव्हाने, आणि GeM/गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस मध्ये समावेश होण्याच्या सुविधेद्वारे स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनामध्ये लघु आणि खासगी उद्योजकांना आणि स्टार्ट-अप्सना, स्थानिक पातळीवरील नवनवीन, किफायतशीर उपाययोजना आणि व्यावसायिक मॉडेल्स/प्रारूपे यांचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देईल.

### २.६.८ नियोजनावर लक्ष केंद्रित करणे:

स्थानिक स्वराज्य संस्थांना कामगिरी विश्लेषणाच्या आधारे विविध कृती योजना तयार करणे आणि सादर करणे आवश्यक असेल उदा.

अ) शहर घनकचरा कृती योजना (सीएसडब्ल्यूएपी) पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय सारख्या भारत सरकारच्या कार्यक्रमांशी आंतरमंत्रालयीन अभिसरण होणे / सांगड घालणे समाविष्ट आहे (कृती योजनेच्या स्वरूपासाठी परिशिष्ट २ चा संदर्भ घ्या);

ब) भारत सरकारच्या नमामी गंगे या (राष्ट्रीय स्वच्छ गंगा अभियान) कार्यक्रमाशी आंतरमंत्रालयीन अभिसरणाचा समावेश असलेली, स्वच्छता आणि गटारे व सांडपाणी यांच्या व्यवस्थापनाकरिता (कृती योजनेच्या स्वरूपासाठी परिशिष्ट ३अ आणि ३ब पाहा) शहर स्वच्छता कृती योजना (सीएसएपी));

क) राज्ये/केंद्रशासित प्रदेश यांनी कचरामुक्त शहरांसाठी कृती योजना एकत्रित करणे आवश्यक आहे.

### २.६.९ अपेक्षित कार्यात्मक परिणामांवर लक्ष केंद्रित करणे

परिणामानुसार निधी उपलब्ध करून देणे हे अभियानचे एक महत्वाचे वैशिष्ट्य असेल, ज्यामध्ये राज्ये/ केंद्रशासित प्रदेश आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांना विशिष्ट लक्ष्ये/ परिणाम/निष्कर्ष प्राप्त करण्याच्या अटीवर राज्ये/ केंद्रशासित प्रदेश यांना केंद्राकडून मिळणाऱ्या निधीचे पहिले आणि दुसरे हप्ते मिळतील. मार्गदर्शक तत्त्वे व्यवहारात किती प्रमाणात आचरणात आणली जात आहेत यावर देखरेख ठेवण्याकरिता स्वच्छ भारत अभियान-नागरीचे एमआयएस पोर्टल हे प्रत्यक्ष जागेवरील माहिती मिळवेल.

### २.६.१० शहरी-ग्रामीण एककेंद्राभिमुखता

आजूबाजूच्या स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामीण भागातील गटांची निकड पूर्ण करण्यासाठी विभाग तत्वावर पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेतले जातील, जेणेकरून कचऱ्यावर प्रक्रिया करण्याच्या सामान्य सुविधांचा कार्यक्षमतेने वापर केला जाईल.

### २.६.११ याद्वारे सक्षम पर्यावरणाची निर्मिती:

अ) राज्ये/केंद्रशासित प्रदेश आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांना त्यांची निविदा कागदपत्रे तयार करण्यासाठी संदर्भ म्हणून मॉडेल आरएफपीज/रीक्वेस्ट फॉर प्रपोजलची निर्मिती;

ब) जीईएमद्वारे राज्ये/ स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकरिता खरेदी प्रक्रिया सुलभ करणे;

क) स्वच्छ भारत अभियान-नागरी २.० अंतर्गत राज्ये/ स्थानिक स्वराज्य संस्था यामधील स्टार्ट-अप इकोसिस्टीम/ सार्वजनिक

खासगी भागीदारीला प्रोत्साहन देणे: शहरी पायाभूत सुविधांमध्ये खासगी भांडवल आणण्याकरिता तसेच शहरी सेवा आणि परिचालन व देखभाल या कामात खासगी क्षेत्राची क्षमता वापरण्याकरिता सार्वजनिक खासगी भागीदारीच्या पद्धतीअंतर्गत प्रकल्पांना प्रोत्साहन दिले जाते.

ड) स्वच्छ भारत अभियान-नागरी २.० अंतर्गत राज्ये/ स्थानिक स्वराज्य संस्था यामधील स्टार्ट-अप इकोसिस्टीम/ सार्वजनिक खासगी भागीदारीला प्रोत्साहन देणे: शहरी पायाभूत सुविधांमध्ये खासगी भांडवल आणण्याकरिता तसेच शहरी सेवा आणि परिचालन व देखभाल या कामात खासगी क्षेत्राची क्षमता वापरण्याकरिता सार्वजनिक खासगी भागीदारीच्या पद्धतीअंतर्गत प्रकल्पांना प्रोत्साहन दिले जाते. सध्याच्या परिस्थितीत, व्हाएबिलिटी गॅप फंडिंगची (आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नसलेल्या प्रकल्पांना निधी देणे) आवश्यकता भासू शकते हेदेखील लक्षात आले आहे. घनकचरा व्यवस्थापनाकरिता, सेंद्रिय कचऱ्यापासून खत, बांधकाम आणि पाडकामामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्यामधून पुनर्वापर केलेले बांधकाम साहित्य इत्यादीसारख्या महसूल देणाऱ्या मार्गांचा लाभ घेता येऊ शकतो, तसेच वापरलेल्या पाण्याच्या व्यवस्थापनासाठी मैल्या पासून खत, पुनर्वापर केलेल्या सांडपाण्याची विक्री इत्यादी महसूल देणाऱ्या मार्गांचा सार्वजनिक खासगी भागीदारी प्रकल्पांसाठी लाभ घेता येऊ शकतो.

### २.६.१२ परिणाम साध्य करण्यासाठी १५व्या वित्त आयोग अनुदानाचा (बंधनकारक आणि अबंधनकारक दोन्हीही) लाभ घेणे

१५व्या वित्त आयोगा अंतर्गत, दहा लाख आणि त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांना स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनामधीलल सेवा स्तरावरील मानक पूर्ण करण्यासाठी ५ वर्षांच्या कालावधीकरिता रु. १३,०२९ कोटी रुपयांचा चॅलेंज फंड प्रदान केला जातो. शिवाय, दहा लाखांहून कमी लोकसंख्या असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण रु.८२,८५९कोटी रुपयांच्या निधीपैकी ४०%निधी हा अबंधनकारक, तर ६०% निधी हा स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापन या राष्ट्रीय प्राधान्यांकरिता बंधनकारक आहे. राज्ये/ केंद्रशासित प्रदेश आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांनी अभियानाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी स्वच्छ भारत अभियान-नागरीच्या निधीव्यतिरिक्त १५व्या वित्त आयोगाच्या निधीचा लाभ घ्यावा. परंतु, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की १५व्या वित्त आयोगाच्या निधीचा वापर राज्य/ केंद्रशासित प्रदेश यांच्याकडून त्यांच्या किमान हिश्श्याची पूर्तता करण्यासाठी (पहा, तक्ता क्र. ४.५.२) केला जाणार नाही,

### २.६.१३ राष्ट्रीय अभियान आणि राष्ट्रीय प्राधान्यक्रमांशी संलग्नता:

स्वच्छ भारत अभियान-नागरी २.०, त्याच्या अंमलबजावणी करण्याच्या घटकांद्वारे राष्ट्रीय प्राधान्यक्रम, अभियान आणि कार्यक्रमांशी संलग्न राहण्याचा प्रयत्न करेल, त्याची काही सूचक उदाहरणे खाली दिल आहेत:

- बांधकाम व पाडकाममधून निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या व्यवस्थापनाद्वारे धूळ कमी करणे हे राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमाशी (NCAP) संलग्न असेल;
- अभियानाच्या खासगी क्षेत्रातील गुंतवणूक धोरणाचा एक भाग म्हणून स्टार्ट-अप्स आणि सामाजिक उद्योजकांना प्रोत्साहित करण्यावर लक्ष केंद्रित करण्यामुळे स्टार्ट-अप इंडिया आणि मेक इन इंडियाच्या आदेशांची तंतोतंत अंमलबजावणी होईल;
- अभियानचे परिणाम आणि नागरिकांशी संपर्क वाढवण्यासाठी डिजिटल सक्षमतेवर सर्व लक्ष केंद्रित करून आणि मिशनच्या सर्व परिणामांवर लक्ष ठेवण्यासाठी सर्वांगीण दृष्टीकोन ठेवून डिजिटल इंडिया, नॅशनल अर्बन डिजिटल मिशन (एनयूडीएम) आणि स्मार्ट सिटीज मिशनच्या आदेशांशी अभियान जोडले होईल;
- कौशल्य विकासाला केंद्रस्थानी ठेवून क्षमताबांधणीवर लक्ष केंद्रित करणे हे स्किल इंडिया/कौशल्य भारताच्या आदेशांशी संलग्न असेल;
- गंगेच्या किनाऱ्यावरील शहरांवर विशेष लक्ष केंद्रित करणे आणि त्यांच्या घनकचरा व्यवस्थापन उपक्रमांना गती देणे हे नमामी गंगे कार्यक्रमाशी संलग्न असेल;
- ओल्या कचऱ्याच्या बायो-मिथेनेशनवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचा प्रस्ताव हा पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या एसएटीएटी कार्यक्रमासोबत घेण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
- स्वच्छता कर्मचारी आणि सफाई मित्रांवर लक्ष केंद्रित करणे जेणेकरून त्यांची सुरक्षितता, कल्याण आणि सुधारित उपजीविकेचे पर्याय हे सामाजिक न्याय आणि कल्याण मंत्रालयाच्या आदेशांशी संलग्न असतील;
- याशिवाय, सर्व सरकारी कार्यालये, कामाची ठिकाणे आणि परिसर कचरामुक्त प्रोटोकॉलच्या मानकांचे

पालन करतात याची सुनिश्चिती करण्यासाठी अभियान काम करेल, जेणेकरून 'स्वच्छता' आणि कचरापासून मुक्तता ही प्रत्येकाची सवय बनेल

## २.७ निधी उपलब्धता

स्वच्छ भारत अभियान-नागरी २.० च्या विविध घटकांच्या अंमलबजावणीकरिता येणारा अंदाजे खर्च १,४१,६०० कोटी रुपये इतका आहे. भारत सरकारचा हिस्सा ३६,४६५ कोटी रुपयांचा असेल. उर्वरित रक्कम लाभार्थी योगदान म्हणून, राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश/ स्थानिक स्वराज्य संस्था खाजगी क्षेत्र यांच्याकडून सार्वजनिक खासगी भागीदारी अंतर्गत दिली जाईल. जेथे खासगी क्षेत्राचा निधी उपलब्ध नसेल, तेथे राज्य/ केंद्रशासित प्रदेशांना आवश्यक तो निधी देणे गरजेचे आहे. उर्वरित निधी हा निधीच्या इतर विविध स्त्रोतांद्वारे संकलित करायचा आहे ज्यामध्ये सार्वजनिक/ खाजगी क्षेत्र, बाहेरून मिळणारे साहाय्य इत्यादींमधून व्यावसायिक सामाजिक जबाबदारी निधीचा समावेश होतो.

## २.८ अभियानाचे परिणाम

अभियानाचा कालावधी संपताना पुढील विचारात घेण्याजोगे परिणाम दिसून येणे अपेक्षित आहे:

१) सर्व वैधानिक शहरे किमान ३-स्टार कचरा मुक्त किंवा त्याहून अधिक प्रमाणित आहेत;

२) सर्व वैधानिक शहरे किमान ओडीएफ+बनली आहेत;

३) एक लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेली सर्व वैधानिक शहरे किमान ओडीएफ++बनली आहेत;

४) एक लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या सर्व वैधानिक शहरांपैकी किमान ५०% शहरे वॉटर+ बनली आहेत.









# प्रकरण ३ - अभियान व्यवस्थापन संरचना

**एक बहु-स्तरीय प्रशासन संरचना तयार करण्यासाठी एकंदर दृष्टीकोन बनविते जी, गती आणि अंमलबजावणी सुलभ करण्यासाठी सक्षम आहे,ज्यात निधी उपलब्ध करणे व पुरेशा निरीक्षणासह आणि गुणवत्तेची तपासणी करणे ह्याचा समावेश आहे.**

एस बी एम नागरी २.० मध्ये खालीलप्रमाणे चार-स्तरीय कार्य व्यवस्थापन रचना राहील.

## ३.१ राष्ट्रीय स्तर

### ३.१.१ राष्ट्रीय सल्लागार आणि पुनरावलोकन समिती (NARC)

एन ए आर सी, सचिव- MoHUA यांच्या नेतृत्वाखाली आणि एस बी एम -ग्रामीण च्या प्रतिनिधींचा समावेश आहे आणि इतर संबंधित मंत्रालये MoHUA द्वारे अधिसूचित असतील.

एन ए आर सी मध्ये चा खालील खालील समावेश असेल:

i सचिव - MoHUA चे अध्यक्ष:

ii राष्ट्रीय अभियान संचालक, एसबीएम- नागरी MoHUA: सदस्य सचिव

iii सहसचिव आणि आर्थिक सल्लागार, MoHUA: सदस्य

iv सल्लागार/ संयुक्त सल्लागार, CPHEEO: सदस्य

v. संचालक, NIUA: सदस्य

vi. सदस्य:

अ.) जलशक्ती मंत्रालय / पेयजल आणि स्वच्छता विभाग (DDWS);

ब.) पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय;

क.) रसायने आणि खत मंत्रालय;

ड.) पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय;

इ.) नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय;

एफ). सामाजिक न्याय मंत्रालय;खर्च विभाग;

जी.) नीती आयोग;

एच.) DAVP (I & B मंत्रालय);

अध्यक्ष-NARC, त्यांच्या निर्देशानुसार, आवश्यकतेनुसार इतर सदस्यांना समाविष्ट करू शकतात. एन ए आर सी (NARC) वर्षातून किमान दोनदा बैठक घेईल. एन ए आर सी (NARC) ची खालीलप्रमाणे कार्ये असतील:

- अभियान प्रगतीसाठी एकूण नियोजन;
- एसबीएम-यू SBM-U २.० लक्ष्य साध्य करण्यासाठी राज्य/ यूटी कृती योजनांचा आढावा घेणे आणि मंजूर करणे;
- राज्ये/ केंद्रांना खासगी वित्तपुरवठा नाविन्यपूर्ण संसाधन यांच्या एकत्रीकरणासाठी मार्ग शोधण्याचा आणि स्वच्छता प्रकल्पांमध्ये पीपीपीसाठी जमिनीचा लाभ घेण्याचा सल्ला देणे;
- SBM (Urban) २.० अंतर्गत केंद्र सरकारने राज्ये / केंद्र शासित राज्यांसाठी निधीचा हप्ता मंजूर करणे आणि जाहीर करणे;
- अभियानाच्या प्रगतीला गती देण्यासाठी आंतरमंत्रालयीन स्तरावर निर्देश देणे.
- SBM (Urban) २.० अंतर्गत मंजूर केलेल्या प्रकल्पांचे परिणाम आणि कामगिरीचे निरीक्षण करणे २.०;

एन ए आर सी (NARC) काही कार्ये, त्याला योग्य वाटेल तशी, विहित मर्यादेत, राष्ट्रीय अभियान संचालनालयाच्या राष्ट्रीय अभियान संचालक (NMD) यांना मिशनच्या जलद अंमलबजावणी करिता सोपवू शकेल.

### ३.१.२ राष्ट्रीय अभियान संचालनालय (NMD)

- SBM राष्ट्रीय अभियान संचालनालय राष्ट्रीय अभियान डायरेक्टरच्या नेतृत्वाखाली कार्य करेल. राष्ट्रीय अभियान संचालक (NMD) हे भारत सरकारच्या सहसचिव दर्जापेक्षा कमी असणार नाही.

- NMD हे SBM-U २.० शी संबंधित सर्व कामकाजाचे एकंदर प्रभारी असतील आणि राष्ट्रीय अभियान संचालनालय येथे योग्य अधिकाऱ्यांच्या टीमद्वारे समर्थित राहतील. NMD, NARC चे सदस्य-सचिव असतील;
- NMD ला समर्पित प्रकल्प व्यवस्थापन युनिट (PMU)/तांत्रिक सहाय्य युनिट (TSU) सह पुरेसे तज्ञ आणि समर्थन कर्मचारी प्रामुख्याने करार पद्धतीच्या आधारावरद्वारे समर्थित केले जाईल.
- NMD ला मिशनची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तांत्रिक सहाय्य केंद्रीय सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरण अभियांत्रिकी संघटना (CPHEEO). द्वारे प्रदान केल्या जाईल.

## ३.२ राज्य स्तर

### ३.२.१ राज्य उच्चाधिकार समिती (SHPC):

राज्याचे मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आणि संबंधित विभागांकडून घेतलेल्या सदस्यांसह राज्य/केंद्रशासित प्रदेश स्तरावर SBM Urban २.० च्या व्यवस्थापनासाठी जबाबदार राहील;

SHPC ची रचना खाली दिली आहे:

- मुख्य सचिव: अध्यक्ष;
- प्रधान सचिव (नगर विकास): सदस्य;
- प्रधान सचिव (सार्वजनिक आरोग्य आणि अभियांत्रिकी) सदस्य;
- प्रधान सचिव (वित्त): सदस्य;
- प्रधान सचिव (गृहनिर्माण): सदस्य;
- प्रधान सचिव (पर्यावरण आणि वन): सदस्य;
- अध्यक्ष - राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ: सदस्य;
- MoHUA प्रतिनिधी: सदस्य;
- SBM-ग्रामीणचे अभियान डायरेक्टर राज्य/केंद्रशासित प्रदेश स्तर: सदस्य;
- राज्य मिशन संचालक: सदस्य सचिव;

SHPC इतर कोणालाही गरजेनुसार सदस्य सह-निवड/समाविष्ट करू शकते. SHPC मुख्यतः धोरणात्मक भूमिका बजावेल नियामकाच्या अनुपालनाच्या देखरेखीसह त्यात समाविष्ट असेल:

***नियोजन***

- SBM उद्दीष्टे साध्य करण्यासाठी एकूण योजना मंजूर करणे
- अल्पकालीन , मध्यम आणि दीर्घकालीन निधी उपलब्धतेचे नियोजन;
- अतिरिक्त संसाधनासाठी नियोजन;
- क्लस्टर्सची निवड जेणेकरून पायाभूत सुविधा शहरे/नगरांच्या समूहा संलग्न ग्रामीण भाग; दरम्यान/ सामायिक केल्या जाऊ शकतात;
- आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भारमुक्त जमिनीचे नियोजन;.

***प्रकल्प प्रगतीचा आढावा आणि अंमलबजावणी***

i राज्याचे शहरी आणि ग्रामीण भागा मध्ये स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनासाठी कृतीची एककेंद्राभिमुखता सुनिश्चित करणे आणि या उद्देशासाठी आंतर-विभागीय समन्वय घडवून आणणे;

ii प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान स्वतंत्र पुनरावलोकन आणि निरीक्षण आयोजित करणे;

iii उपलब्ध केल्या गेलेल्या निधीचे वेळेवर लेखापरीक्षण सुनिश्चित करणे आणि मिशनच्या 'लेखापरीक्षण अहवालावर' ' कारवाई केली अहवाल 'यांचे आणि इतर तत्सम अहवालांचे पुनरावलोकन

***भागधारकांची क्षमता निर्मिती***

i काही राजकीय शक्ती असलेली आणि राज्याची सेवा करणारी संघटना ज्या ULB ला वापरलेले पाणी व्यवस्थापन लागू करण्यात मदत करतील अशा संस्थांची क्षमता वाढवणे सुलभ करणे;

ii क्षमता वाढविणाऱ्या उपक्रमांच्या प्रगतीचा व IEC आणि अभियान अंतर्गत सार्वजनिक जनजागृती उपक्रमांचा आढावा घेणे;

***इतर अनुषंगीक***

- नियम आणि परिस्थिती उल्लंघन संबोधित करणे ;
- काही असल्यास कायदेशीर समस्यांचे पुनरावलोकन करणे;
- मिशनच्या कार्यक्षम अंमलबजावणीसाठी आवश्यक, किंवा राष्ट्रीय अभियान संचालनालय द्वारे संदर्भित केलेल्या इतर बाबी;

### ३.२.२ राज्यस्तरीय तांत्रिक समिती (एसएलटीसी):

प्रकल्पांचे पुनरावलोकन आणि मंजुरीसाठी, प्रधान सचिव नगरी विकास यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तांत्रिक समिती राहील आणि राज्य अभियान संचालक- SBM संयोजक म्हणून राहतील.

- प्रधान सचिव : अध्यक्ष;
- राज्य अभियान संचालक: संयोजक;
- एसबीएम- ग्रामीणचे प्रभारी सचिव;
- सचिव (पाणीपुरवठा) : सदस्य;
- सचिव (वित्त) : सदस्य;
- सचिव (पर्यावरण आणि वन) : सदस्य;
- प्रतिनिधी, एसपीसीबी: सदस्य;
- MoHUA प्रतिनिधी: सदस्य;
- संबंधित पॅरास्टेटल संस्थांचे प्रतिनिधी.

SLTC गरजेनुसार इतर कोणत्याही सदस्यांची निवड करू शकते/ समाविष्ट करू शकते.

SLTC च्या भूमिकेत हे समाविष्ट असेल:

i वार्षिक टाइमलाइन सह राज्य कृती योजना ULBs ODF+ तयार करणे, ODF++, वॉटर+, ३ star garbage free साठी;

ii स्वच्छतेसाठी CSAP आणि CSWAP, वापरलेले पाणी आणि SWM SBM(Urban) २.० अंतर्गत सर्व शहरांना मदत करणे;

iii IT सक्षम साधनांचा वापर सुलभ करणे आणि प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी उपाय करणे;

iv DPR आणि संबंधित स्वच्छता प्रकल्पांचे पुनरावलोकन करणे, घनकचरा व्यवस्थापन, वापरलेले पाणी व्यवस्थापन, ULB द्वारे शिफारस केलेले IEC आणि CB;

v. निधी मिळविण्यासाठी प्रपोजल ट्रॅकिंग सिस्टम (PTS) वर अपलोड करण्यासाठी प्रकल्प मंजूर करणे.

SHPC ने वर्षातून किमान दोनदा, किंवा अधिक वेळा भेटावे अशी शिफारस केली जाते तर SLTC किमान ३ महिन्यांत एकदा, किंवा अधिक वारंवार भेटावे. ULB कडून प्रस्ताव नुसार बैठका घेता येतील.

### ३.२.३ एसबीएम राज्य अभियान संचालनालय

- एसबीएम राज्य अभियान संचालनालयाचे नेतृत्व योग्य ज्येष्ठतेचे राज्य अभियान संचालक (एसएमडी) करतील. एसएमडी एसएचपीसीचे सदस्य-सचिव आणि एसएलटीसीचे संयोजक म्हणूनही काम करेल;
- राज्य अभियान संचालनालयाला प्रतिनियुक्ती/PMU आउटसोर्सिंग तत्वावर समर्पित द्वारे मदत दिले जाईल. त्यासाठीचा निधी राज्य/ यूटीला देण्यात आलेल्या SBM २.० अंतर्गत क्षमता निर्माण निधीतून पूर्ण केला जाऊ शकतो.

राज्य अभियान संचालकांच्या खालील भूमिका समाविष्ट असतील:

- यूएलबी स्तरावर मिशनअंतर्गत मंजूर प्रकल्पांचे नियोजन, डिझाइनिंग, प्रकल्प तयारी, मूल्यांकन, मंजुरी आणि अंमलबजावणीसाठी राज्यभरात एकसमान रचना तयार करणे/ सूचित करणे;
- SBM-U २.० अंतर्गत समाविष्ट असलेल्या सर्व शहरांसाठी CSAP, CSWAP चा आढावा घेणे;
- भौतिक आणि आर्थिक लक्ष्यांच्या बाबतीत एकत्रित राज्यस्तरीय योजना (सर्व यूएलबीच्या योजनांचा सारांश) SLTC ला ठेवणे
- अतिरिक्त संसाधनसाठी नियोजन करणे;
- आयटी सक्षम साधने आणि डीपीआर तयार करण्यासाठी उपाय विकसित करणे, किंवा डीपीआर तयारीसाठी MoHUA ने प्रदान केलेल्या विद्यमान साधनांचा वापर सुलभ करणे;

- SHPC च्या मार्गदर्शनाखाली अल्प, मध्यम आणि दीर्घकालीन निधी प्रवाहासाठी नियोजन;
- अभियान अंतर्गत प्रकल्पांसाठी निधीचे हप्ते जाहीर करण्याच्या प्रस्तावांची शिफारस करणे;
- राज्यात स्वच्छतेसाठी कृतीचे अभिसरण सुनिश्चित करणे आणि आवश्यकतेनुसार या उद्देशाने आंतरविभागीय समन्वय आणणे;
- या मोहिमेच्या विविध लेखापरीक्षण अहवालांवर आणि इतर तत्सम अहवालांवर "कृती अहवाल" वेळेवर जारी केले आहेत याची खात्री करणे आणि त्याचाआढावा घेणे;
- प्रकल्पांच्या अंमलबजावणीदरम्यान स्वतंत्र पुनरावलोकन आणि देखरेख करण्यासाठी एजन्सींचे पॅनेलिंग;
- यूएलबीकडून प्राप्त डीपीआरची तांत्रिक तपासणी आणि प्रधान सचिव (यूडी) यांच्या अध्यक्षतेखाली एसएलटीसी बैठक आयोजित करणे;
- एसएचपीसी बैठकांचा अजेंडा विकसित करण्यासाठी आणि ठेवण्यासाठी अतिरिक्त मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव (नगर विकास) यांना पाठिंबा देणे.
- या मोहिमेच्या कार्यक्षम अंमलबजावणीसाठी संबंधित इतर कोणतीही बाब किंवा SBM-U २.० राष्ट्रीय अभियान संचालनालयाने त्याचा उल्लेख केलेल्या बाबी.

## ३.३ जिल्हा स्तर

जिल्हा मुख्यालयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षपदावर जिल्हा स्तरीय समिती (डीएलसी) स्थापन केली जाईल;

SBM ग्रामीणसह शहरी २.० मधील अभिसरणाचे सर्व पैलू संबंधित मोहीमा राबवताना देखरेखीसाठी डीएलसी जबाबदार असेल.

## ३.४ शहर पातळी

- यूएलबीचे म्युनिसिपल कमिशनर (एमसी)/ कार्यकारी अधिकारी (ईओ) हे यूएलबी पातळीवर येथे अभियानाचे सर्व घटक कार्यान्वित करण्यासाठी जबाबदार प्रशासकीय प्राधिकरण असतील.
- सर्व अभियान घटकांच्या सुरळीत आणि अखंड अंमलबजावणीसाठी एमसी/ ईओ देखील जबाबदार असेल.
- एमसी/ ईओच्या जबाबदाऱ्या खालील प्रमाणे असतील

खालील खालील समाविष्ट करा:

i. पालिका कर्मचार् यांची क्षमता निर्माण करण्याची सुविधा;

ii. अंतर विश्लेषण आणि शहर पातळीचे सांडपाणी व घनकचरा आराखडा तयार करणे;

iii. प्रकल्प अहवाल तयारी;

iv. एसएचपीसी/ एसएलटीसीकडून निधी मिळविण्यासाठी राज्याशी समन्वय साधणे आणि प्रकल्पांसाठी निधी मुक्ती;

v. सतत कार्यक्षमता सुनिश्चित करण्यासाठी सतत देखरेख कालबद्ध पद्धतीने प्रकल्प कार्यान्वित करणे;

vi. आर्थिक टिकाऊपणा सुनिश्चित करण्यासाठी वापरकर्ता शुल्क (User Charges) गोळा करणे;

vii. जागरूकता आणि नागरिकांचा सहभाग;

viii. तयार केलेल्या मालमत्तेच्या कार्यक्षम कामकाजाचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी आणि देखरेख करण्यासाठी निवडक नागरिक प्रतिनिधींच्या सहभागाने शहर स्वच्छता समित्या स्थापन करणे.


Public Financial Management System - PFMS
O/o Controller General of Accounts, Ministry of Finance
Login
As the Nation celebrates
Azadi Ka Amrit Mahotsav
Let us
SING THE
NATIONAL
ANTHEM
Participate Now
Todays Transactions
Count: 5,42,216
Amount (Crores): 47,484
FY 2021 - 22 Transactions
Count: 85,09,20,985
Amount (Crores): 19,63,009
Know your Payments
Track NSP Payments
Get Login Details If Agency is already registered
What's New
Publications
Help Desk
Manage Registered Agency
Direct Benefit Transfer
Centrally Sponsored Schemes
Central Sector Schemes
Others


Public Financial Management System - PFMS
O/o Controller General of Accounts, Ministry of Finance
Login
Promotes good governance
Todays Transactions
Count: 5,42,216
Amount (Crores): 47,484
FY 2021 - 22 Transactions
Count: 85,09,20,985
Amount (Crores): 19,63,009
Know your Payments
Track NSP Payments
Get Login Details If Agency is already registered
What's New
Publications
Help Desk
Manage Registered Agency
Direct Benefit Transfer
Centrally Sponsored Schemes
Central Sector Schemes
Others
Direct Benefit Transfer


DELHI > CENTRAL DELHI > TEST ULB
Support
User Manual
Test Login
SELECT SECTOR
Home / Proposals / Select Sector
PLEASE CHOOSE THE SECTOR FOR WHICH YOU WANT TO INITIATE PROPOSAL
Construction & Demolition (C&D) Waste
Solid Waste Management
Waste Water Management
IEC
Dumpsite Remidiation
Mechanical Sweeping
Capacity Building
वापरले
Basic City Info
City Non BWGs
City Bulk Waste Generators
City Facilities
Monthly Progress
Bulk Uploads
Swachh Survekshan
Safaimitra Suraksha Challenge
Sanitation Plan
Information, Education & Communication
Proposals
Dashboard
Proposals
CT/PT
User Administration
GIS Management
Contacts Management
Copyright 2021 © All Rights Reserved.

# प्रकरण ४ - निधी संरचना

**राज्ये केंद्राद्वारे / केंद्र शासित प्रदेशनिधी जाहीर करण्यासाठी एकूण तत्वे निश्चित करणे आणि विविध अभियान घटकांसाठी त्यांच्या निधीची उपलब्धता वाढविण्यासाठी राज्ये/केंद्र शासित प्रदेश आणि स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांद्वारे १५व्या वित्त आयोगाचे अनुदानाचेफायदे निश्चित करणे.**

उपरोक्त ४.१.२ प्रमाणेवापरकर्ताशुल्कसंकलनासाठी, ULB त्यांच्या SBM-U २.० अंतर्गतराज्ये /केंद्रशासित प्रदेशांना निधीवाटप, तारतम्यानुसार, पूरकअनुदान (क्रॉस-सबसिडी) देऊ शकतात व शहरी स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांसाठी निधी प्राप्त करण्यासाठी प्रवेशाच्या अटींसह, गरीब कुटुंबे आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी, अनुदानाचे प्रमाण रचना (फंड शेअरिंग पॅटर्न) आणि अभियान घटकांना निधी देण्यासाठी स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांना ठरवायचे आहे. इतर स्त्रोतांकडून निधीचा लाभ घेण्याची पध्दत या प्रकरणात खाली दिली आहे

## ४.१ प्रवेश पातळीची परिस्थिती

स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० मध्ये सहभागी होण्यासाठी, खालील अटी,राज्ये/केंद्रशासित प्रदेश आणि ना. स्वा.स्व.संस्थे द्वारे अनिवार्यपणे पूर्ण केल्या जाणे आवश्यक आहे:

**४.१.१** मालमत्ता कराचे दर बाजार मुल्या नुसार निश्चितकरणे, नियतकालिकपुर्नविलोक्त GSDP च्या अनुषंगाने, १५ वा वित्त आयोग द्वारे शिफारस केल्यानुसार (खालील टीप पहा)

**४.१.२** प्रदान केलेल्या सेवांसाठी वापरकर्ता शुल्क आकारणे आणि नियतकालीक वाढीसह परिचालन खर्च (ऑपरेशनल कॉस्ट) वसूल करणे;

**४.१.३** सर्व स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांनी सार्वजनिक आर्थिक व्यवस्थापन प्रणाली स्वीकारली पाहीजे

***टिप : राज्ये/केंद्रशासित प्रदेशांद्वारे मालमत्ता कराच्या दराची अधिसूचना आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्था द्वारे त्याचा अवलंब करणे आणि परिचालन खर्चाचा एक घटक वसूल करण्यासाठी वापरकर्ता शुल्काची अधिसूचना केंद्रीय सहाय्यासाठी अनिवार्य अटी बनवल्या जातील. राज्ये/केंद्रशासित प्रदेशांनी तिसऱ्या वर्षापासून केंद्रीय सहाय्यासाठी पात्र होण्यासाठी सातत्यपूर्ण अभियान सुरु केल्यापासून पहिल्या दोन वर्षात त्यांची अंमलबजावणी करावी लागेल.***

## ४.२ राज्य नोडल खाते SNA आणि PFMS

स्वच्छ भारत अभियान (नागरी ) २.० अंतर्गत निधी प्राप्त करण्यासाठी, सर्व व्यवहार DBT द्वारे करावे लागतील, आणि/किंवा EAT (मॉड्यूल्स) द्वारे. या संदर्भात, वित्त मंत्रालयाच्या ओएम क्रमांक F. १(१३) PFMS |FCD/ २०२० दिनांक २३ मार्च २०२१, किंवा वेळोवेळी अद्ययावत (अपडेट) केल्यानुसार, लागू होईल.

## ४.३ सार्वजनिक खाजगी भागीदारी (पीपीपी)

**४.३.१** स्वच्छ भारत अभियान (नागरी ) २.० अंतर्गत, PPP मोड अंतर्गत प्रकल्पांना प्रोत्साहन दिले जाते, शहरी पायाभूत सुविधांमध्ये खाजगी भांडवल आमंत्रित वितरणामध्येखाजगीक्षेत्राचीकार्यक्षमताआणण्यासाठी सध्याच्या परिस्थितीत, व्यवहार्यताअंतर निधीची आवश्यकता असू शकते. घनकचराव्यवस्थापनासाठी, महसूल प्रवाहजसेकी सेंद्रिय कचऱ्यापासून कंपोस्ट, C&D कचऱ्यापासून पुनर्नवीनीकरण केलेले बांधकाम साहित्य इत्यादींचा लाभ घेता येऊ शकतो, सांडपाणी व्यवस्थापन, मैलापासून कंपोस्ट कचरा, पुनर्वापर केलेल्या सांडपाण्याची विक्री इ सारखे महसूल स्रोत यांचा PPP प्रकल्पांसाठी फायदा होऊ शकतो.

**४.३.२** वरीलकारणांसाठी सर्व स्थानिक नागरी स्वराज्य संस्था ने प्रथम PPP मोडमध्ये (वेगवेगळ्या लोकसंख्येच्या स्थानिक नागरी स्वराज्य संस्था लापुरवणाऱ्या क्लस्टर स्तरावरील प्रकल्पांसह) प्रकल्प हाती घेण्याची शक्यता तपासली पाहिजे. VGF चादावा करण्यासाठी विहित निधीपद्धती नुसार भारत सरकारचे निधी उपलब्ध असतील. केंद्रीय सहाय्यातून VGF चे पेमेंट गॅपफंडिंगच्या ५०% असेल तर प्रकल्प किमतीच्या जास्तीत जास्त ३०% असेल. प्रकल्पाची किंमत, किंवा प्रचलित केंद्रसरकारची मार्गदर्शकतत्वा नुसार असू शकतात. एस्क्रो खात्या द्वारे सामान्य पीपीपी मोड किंवा हायब्रिड ॲन्युइटी मॉडेल (HAM) मध्ये दिले जाऊ शकते. VGF योजनेंतर्गत PPP

प्रकल्पांना आर्थिक सहाय्यासाठी भारत सरकारची मार्गदर्शक तत्त्वेया उद्देशासाठी संदर्भित केली जाऊ शकतात.

**४.३.३** VGF अनुदान वितरण खाजगी भागीदारासोबत करार राज्य सरकारने मंजूर केल्या प्रमाणे असेल. मात्र, राज्य सरकारकडे निधी पडून राहणार नाही याची काळजी घेतली जाईल.

**४.३.४** ईपीसी मोड वर हाती घेतलेल्या क्लस्टरप्रकल्पांसाठी, क्लस्टर अंतर्गत प्रस्तावित केलेल्या स्थानिक नागरी स्वराज्य संस्थाच्या लोकसंख्येच्या श्रेणीवर अवलंबून, निधी वितरण हिश्श्याच्या प्रमाणात असेल.

**४.३.५** प्रकल्प व्यवहार्य बनवण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रत्येक घटकासाठी विहित केलेल्या किमान भागापेक्षा जास्त निधी राज्यसरकारे स्थानिक नागरी स्वराज्य संस्थासाठी जोडू किंवा निर्माण करू शकतात.

**४.३.६** शौचालय, SWM आणि वापरलेल्या जल व्यवस्थापन प्रकल्पांसाठी राज्य सरकारचा प्रस्ताव मान्य करण्यावर पुरेसा निधी जाहीर केला जाईल.

**४.३.७** PPP मोडवर हाती घेतलेल्या प्रकल्पाच्या कराराच्या आवश्यकते नुसार राज्ये VGF केंद्र सरकारचा वितरीत करतील.

**४.३.८** जर राज्य सरकारला वाटत असेल की एखादा प्रकल्प PPP पद्धतीनुसार घेण्यास योग्य नाही, तर ते भारत सरकारचा / केंद्र सरकारचाहिस्सा (निधीनमुन्यानुसार) भारत सरकारचा / केंद्र सरकार कडून स्थानिक नागरी स्वराज्य संस्था ला अनुदान म्हणून गृहीत धरू शकेल. प्रकल्पासाठी शिल्लक संसाधनांची व्यवस्था करणे हे राज्य सरकार आणि स्थानिक नागरी स्वराज्य संस्थावर अवलंबून असेल, ज्याची खात्री प्रकल्प मंजूर करताना केली पाहिजे. बाह्य सहाय्यि तप्रकल्प (EAP) तयारकरणे, अंमलबजावणीकरणे आणि देखरेखकरणेयासाठी भारत सरकारची मार्गदर्शक तत्त्वेया उद्देशासाठी संदर्भित केली जाऊ शकतात.

## ४.४ निधीचे वाटप:

**४.४.१** विविध घटकांसाठी निधीच्या खालील वर्गीकरणासह मिशनची अंमलबजावणी केली जाईल:

| क्रमांक | वर्गीकरण | मिशन कालावधीसाठी एकूण रक्कम (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १. | प्रकल्प निधी (स्वच्छता, एसडब्ल्यूएम आणि वापरलेल्या पाणी व्यवस्थापनासाठी) | **१,२५,४३०** |
| | • SWM | **३९,८३७** |
| | • स्वच्छतेसाठी | **५,६१०** |
| | • वापरलेल्या जल व्यवस्थापनासाठी | **७९,९८३** |
| २. | लोकजागृती आणि आयईसी | **६,२७१** |
| ३. | क्षमताबांधणी आणि A.O.E. | **३,७६३** |
| ४. | वचनबद्धदायित्व (SBM-U मधील शिल्लक) | **६,१३६*** |
| ५. | **एकूण खर्च** | **१४१,६००** |

** 'वचनबद्ध दायित्वे' केवळ ३१ मार्च २०२३ पर्यंत सुटकेसाठी वैध असतील, ज्याच्या पलीकडे दावा न केलेली रक्कम जाईल.*

**४.४.२** एसडब्ल्यूएमसाठी निधी एसडब्ल्यूएममधील एसबीएम-अर्बनअंतर्गत आधीच केलेल्या गुंतवणूकीचा उपयोग करून घेता येईल, तर अभियानात नवीन घटक असलेल्या वापरलेल्या पाणी व्यवस्थापनासाठी,बरीच पूर्व तयारी करणे आवश्यक असल्याचे लक्षात घेऊन निधी बाबत विचार करण्यात आला आहे.

## ४.५ फंड शेअरिंग

निधीचे केंद्र: राज्य वितरण खालील प्रमाणे असेल:

- ईशान्य भारतातील /हिमालयीन राज्यांमधील स्थानिक नागरी स्वराज्य संस्थासाठी ९०%:१०%,
- १००% - विधिमंडळ नसलेल्या केंद्रशासित प्रदेशासाठी,

- ८०%:२०% - विधिमंडळ असलेल्या केंद्रशासित प्रदेशासाठी,
- २५%:७५% - १० लाख अधिक लोकसंख्या असलेल्या स्थानिक नागरी स्वराज्य संस्थासाठी,
- ३३%:६७% - स्थानिक नागरी स्वराज्य संस्थासाठी १ लाख ते १० लाख लोकसंख्या असलेल्या (दोन्ही समाविष्ट) स्थानिक नागरी स्वराज्य संस्था,
- ५०%:५०% - १ लाखपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या स्थानिक नागरी स्वराज्य संस्थासाठी विविध घटकांसाठी केंद्र आणि राज्ये/ केंद्रांमधील निधी वाटपाची रचना खाली दिली आहे:

### ४.५.१ आयएचएचएल साठी

| क्रमांक | राज्य/ यूटीचा प्रकार | प्रति युनिट सेंट्रल शेअर (₹) | राज्य/ यूटी शेअर प्रति युनिट (₹) |
|---|---|---|---|
| १. | विधिमंडळ नसलेल्या केंद्रशासित प्रदेशासाठी | ४,००० | १,३३३ **(केंद्राद्वारे सहन केले जाईल)** |
| २. | विधिमंडळ असलेल्या केंद्रशासित प्रदेशासाठी | ४,००० | १,३३३ |
| ३. | ईशान्य भारतातील आणि डोंगराळ राज्ये | १०,८०० | १,२०० |
| ४. | इतर राज्ये | ४,००० | २,६६७ |

***टीप: - आयएचएचएलची अंदाजे किंमत प्रति युनिट ₹३०,००० असल्याचे गृहीत धरले जाते***

### ४.५.२ सीटी/ पीटी/ युरिनल्स/ वापरलेले पाणी व्यवस्थापन / एसडब्ल्यूएम साठी

| क्रमांक | राज्य/ यूटीचा प्रकार | प्रत्येक युनिटमध्ये मध्यवर्ती हिस्सा * (%) | प्रति युनिट किमान राज्य/ यूटी हिस्सा (%) | बॅलन्स (१५व्या एफसी फंडातून, यूएलबी शेअर, प्रायव्हेट सेक्टर शेअर) |
|---|---|---|---|---|
| १. | विधिमंडळ नसलेल्या केंद्रशासित प्रदेशासाठी | १०० | ० | - |
| २. | विधिमंडळ असलेल्या केंद्रशासित प्रदेशासाठी | ८० | २० | - |
| ३. | ईशान्य भारतातील आणि डोंगराळ राज्ये | ९० | १० | - |
| ४. | इतरराज्ये: १० लाख अधिक लोकसंख्या असलेल्या स्थानिक नागरी स्वराज्य संस्था साठी | २५ | १६ | ५९ |
| ५. | इतरराज्ये: १ लाख ते १० लाख लोकसंख्या असलेल्या (दोन्हीसमाविष्ट) स्थानिक नागरी स्वराज्य संस्था | ३३ | २२ | ४५ |
| ६. | इतरराज्ये: १ लाख ते १० लाख लोकसंख्या असलेल्या (दोन्हीसमाविष्ट) स्थानिक नागरी स्वराज्य संस्था | ५० | ३३ | १७ |

### ४.५.३ आयईसी आणि सीबीसाठी

| क्र मां क | राज्य/ यूटीचा प्रकार | केंद्रीय हिस्सा (%) | राज्य/ यूटी शेअर (%) |
|---|---|---|---|
| १. | विधिमंडळ नसलेल्या केंद्रशासित प्रदेशासाठी | १०० | ० |
| २. | विधिमंडळ असलेल्या केंद्रशासित प्रदेशासाठी | ८० | २० |
| ३. | ईशान्य भारतातील आणि डोंगराळ राज्ये | ९० | १० |
| ४. | इतर राज्ये | ६० | ४० |

**४.५.४** केंद्रीय निधीचा हिस्सादोन (२) / तीन (३) हप्त्यांमध्ये वितरीत केलाजाईल. प्रत्येकघटकासाठी वितरणाचा तपशील त्या घटकाच्या प्रकरणात तपशीलवार दिला आहे. आयएचएचएलसाठी, २ हप्त्यांसाठी वितरण ५.१.६.१ आणि ५.१.६.२ मध्ये दिली आहे; CT/PT/ युरिनल्ससाठी, ५.२.७.३ आणि ५.२.७.४; SWM ६.९.२ , ६.९.३ आणि ६.९.४ ; वापरलेल्या पाणी व्यवस्थापनासाठी ७.१०.२.१, ७ .१०.२.२ आणि ७.१०.२.३; आयईसीसाठी ८.७.३ आणि ८.७.४; आणि सीबीसाठीकलम९.१६.३आणि ९.१६.४ मध्ये तपशील दिला आहे.

### ४.६ इतर

**४.६.१** IHHL, CT/ PT आणि Urinals साठी वाटप केलेला एकूण निधी एकत्रित पानपणे उपलब्ध करून दिला जाईल. तथापि, राज्ये/ केंद्र शासित प्रदेशांना शौचालय बांधण्याकरिता निधी वाटपाची लवचिकता देण्यात येत आहे. एकूण रकमेच्या २५% रक्कम केंद्र शासन स्वच्छतेकरिता तरंगता निधी म्हणून राखून ठेवेल जेणे करून राज्य / केंद्र शासित प्रदेशांना अतिरिक्त शौचालायानकरिता निधी उपलब्ध करून देता येईल.

**४.६.२** राज्ये/ केंद्रशासित प्रदेश आणि स्थानिक नागरी स्वराज्य संस्था उर्वरित आवश्यक निधी करिता १५ वा वित्त आयोगाचा निधी, खासगी क्षेत्राती लसहभाग किंवा निधीचे इतरस्त्रोत वापरण्यात यावे चालाभघेणे आवश्यक आहे.

**४.६.३** ईशान्य भारतातील आणि हिमालयीन राज्यांसाठी MoHUA प्रत्येक वर्षीसाठी एकूण निधी वाटपाच्या किमान १०% रक्कम राखून ठेवण्याचा प्रयत्न करेल.

**४.६.४** निधी वितरणाकरिता राज्याच्या नागरी लोकसंखेचे भारताच्या एकूण नागरी लोकसंख्येचे गुणोत्तर (९०% भार) आणि (ब) राज्याच्या क्षेत्रफळाची भारताच्याएकूण क्षेत्रफळ चे गुणोत्तर (१०% भार) नुसार वितरीत करण्यात येईल.

**४.६.५** सविस्तर प्रकल्प अहवालांना मंजुरी (DPR)

**४.६.५.१** या मार्गदर्शक सूचनांनुसार SLTC प्रकल्पांना मंजुरी देईल.

**४.६.५.२** अभियाना अंतर्गत केवळ नवीन प्रकल्पांचा विचार केला जाईल आणि कोणतीही पुनरावृत्ती होणारनाही याची खात्री केली जाईल. राज्य आणि केंद्रीय योजनां अंतर्गत प्रकल्प आधीच मंजूर आणि चालू नसल्यासत्यांना "नवीन" मानलेजाईल आणि बाह्य-अनुदानित कार्यक्रम/प्रकल्प.

**४.६.५.३** प्रकल्प मंजुरी, निधी वितरण आणि देखरेखीसाठी तयार करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयारीचा खर्च आणि अभियाना अंतर्गत प्रकल्पांसाठी पॅनेल केलेल्या एजन्सी/ संस्थांद्वारे त्यांची तपासणी संबंधित घटकांच्या प्रकल्प निधीतून प्रतिपूर्ती केली जाईल. DPR तयारीचा खर्च खुल्या स्पर्धेद्वारे शोधला पाहिजे आणि MOHUA वेळोवेळी स्वतंत्रपणे विहित केल्याप्रमाणे वरच्या मर्यादेच्या अधीन असले पाहिजे.

**४.६.५.४** विशिष्ट घटकासाठी त्यांची राज्य आराखडा सादर केल्यानंतर ६ महिन्यांच्या आत सर्व अभियान घटक NARC ला सादर करण्यासाठी राज्ये/ केंद्र शासित प्रदेश त्यांची एकत्रित कृती योजना सादर करतील .

**४.६.५.५** राज्ये/ स्थानिक स्वराज्य संस्थायांना DPR तयारीसाठी आयटी-सक्षम उपाय वापरण्यास प्रोत्साहितकेले जाईल.

**४.६.६** MoHUA ने स्थापनकेलेल्या Solid & Liquid Waste Management साठी तंत्रज्ञान मूल्यांकन समिती (TEC) द्वारेउदयोन्मुख/ नाविन्यपूर्ण उपाय आणि तंत्रज्ञान राज्ये आणि स्थानिक स्वराज्य संस्था विचारार्थसादर केले जाऊ शकतात. या पैकी काही संभाव्य तंत्रज्ञान टीईसीच्या शिफारशींच्या अधीनराहून प्रायोगिकतत्वावर त्यांची चाचणी करण्यासाठी आर्थिकमदत आणि NARC च्या मंजुरीसाठी वाढविली जाईल.

### ४.६.७ प्रकल्पाच्या स्वरुपात बदल

**४.६.७.१** SLTC ला IHHL आणि CT/PT/ URINAL साठी लक्ष्य पुन्हा निश्चित करण्याची लवचिकता असेल, राज्यनिहाय एकूण निधी उपलब्धता (संपूर्ण अभियान कालावधीसाठी IHHL आणि CT/PT साठीचा एकूण निधी बदलता येणार नाही. .

**४.६.७.२** विशेष परिस्थितीत, राज्ये/ केंद्र शासित प्रदेश अशा प्रकल्पांचे स्वरूप (खर्च, प्रकार) बदलू शकतात ज्यासाठी MOHUA ने निधी जाहीर केला असला तरी वास्तविक खर्च होण्यापूर्वी.असे बदल करण्यास SHPC ची मान्यता द्यावी आणि सुधारित प्रकल्प कार्यान्वित होण्यापूर्वी MOHUA कडे सहमतीसाठी पाठवावे.

**४.६.७.३** राज्ये/ केंद्र शासित प्रदेश आपल्या स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये वितरीत केलेल्या निधीचे पुनर्वितरण करू शकतात, अशा पुनर्वितरणाला SHPC च्या मंजुरीच्या अधीन राहून आणि त्यानंतर MoHUA प्रत्यक्ष खर्चापूर्वी सहमती घ्यावी लागेल.

# प्रकरण ५ - शौचालये सार्वजनिक /समुदाय, आयएचएचएल (शौचालये, मुतारी)

**शहरी भारतातील प्रत्येक नागरिकाला सुरक्षित स्वच्छता पायाभूत सुविधा उपलब्ध करणे.व मैला व्यवस्थापनासाठी सुरक्षित नियंत्रण सुविधा उपलब्ध करणे.**

## ५.१ वैयक्तिक घरगुती शौचालये (आयएचएचएल)

### ५.१.१ लक्ष्य गट

वैयक्तिक घरगुती शौचालय (आयएचएचएल) शौचालये बांधण्यासाठी लक्ष्य गट:

- नवीन स्वतंत्र कुटुंबे;
- सर्व नवीन कुटुंबे जी शहरी भागात स्थलांतरित झाली असतील;
- अशी कुटूंबे जी यापूर्वी सार्वजनिक शौचालयांचा वापर करीत होते व त्यांना आता स्वत:ची शौचालयाची आवश्यकता आहे.
- अस्वच्छ शौचालये असलेली सर्व कुटुंबे.

### ५.१.२ लाभार्थी कुटुंबांची निवड

**५.१.२.१ *लाभार्थी कुटुंबाची निवड मार्गदर्शक तत्वांनुसार केली जाईल:***

- स्थानिक स्वराज्य संस्था आवश्यक नवीन आयएचएचएलच्या संख्येचे गरज निश्चीत करण्यासाठी विश्लेषण करतील;
- जर एखाद्या कुटुंबाला यापूर्वी योजनेअंतर्गत आयएचएचएल च्या बांधकामासाठी निधी मिळाला असेल, तर ते कुटुंब पुन्हा शौचालयांसाठी निधी प्राप्त करण्यास पात्र ठरणार नाही; किमान ओडीएफ+ घोषित करण्यात आलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेने स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० अंतर्गत निधीची विनंती करू शकते. सर्वेक्षणात अतिरिक्त आयएचएचएल युनिट्सची गरज असल्याचे दिसून आल्यास पात्र लाभार्थी कुटुंबांना या योजनेअंतर्गत शौचालये दिली जातील. अधिकृत अनधिकृत वसाहतींमध्ये तसेच अधिसूचित/ अधिसूचित नसलेल्या झोपडपट्ट्यांमध्ये राहत असलेल्या कुटुंबांना सुद्धा लाभ मिळू शकेल.

### ५.१.३ बांधकाम आणि डिझाइन

***५.१.३.१ बांधलेल्या घरगुती शौचालयांमध्ये दोन मुख्य रचना असतील***

१) शौचालये मुख्य रचना (पॅन आणि पाण्याच्या साठयासह) आणि २) उपरचना सेप्टिक टँक आणि शौचकुप खड्डा (ऑन-साइट प्रक्रिया प्रणाली) किंवा विद्यमान भूमिगत मलनिस्सारण प्रणालीशी जोडणी. शौचकुप खड्डा व सेप्टिक टँकचा समावेश असलेली ऑन-साइट डिस्पोजल सिस्टम IS-२४७० Pt- १ & २ नुसार डिझाइन केली जाईल (प्रस्तावित घरगुती शौचालयापासून मलनिस्सारण प्रणाली ३० मीटरच्या आत उपलब्ध नसल्यास)

***५.१.३.२*** प्रस्तावित घरगुती शौचालयापासून ३० मीटरच्या आत जेथे मलनिस्सारण यंत्रणा उपलब्ध असेल, तेथे केवळ शौचालयाची सुपरस्ट्रक्चर बांधली जाऊ शकेल आणि सध्याच्या मलनिस्सारण प्रणालीशी जोडले जाईल. मलनिस्सारण रेषेपासून ३० मीटरपेक्षा जास्त अंतरावर एकापेक्षा जास्त घर असल्यास, एकत्रित सहभागातून संसाधने एकत्र करून या घरांना जवळच्या मलनिस्सारण प्रणालीशी जोडण्याचा प्रयत्न करेल.

***५.१.३.३*** स्थानिक स्वराज्य संस्था मधील पाणीपुरवठा व्यवस्थेच्या अनुषंगाने सर्व आयएचएचएल बांधले पाहिजे. घरगुती शौचालयांचे आणि देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी लाभार्थीवर असेल. शिवाय, यूएलबी खाजगी क्षेत्रातील उद्योजकांनी आणलेल्या नाविन्यपूर्ण वैद्यानिकदृष्टया सुरक्षीत घरगुती शौचालय मॉडेल्सची निवड करू शकतात

### ५.१.४ देखभाल व दुरुस्ती

स्थानिक स्वराज्य संस्था कडून नियमीतपणे मैला साफ नेणे आवश्यक आहे. (ओडीएफ++ प्रोटोकॉलनुसार)

### ५.१.५ आयएचएचएलसाठी अर्ज

*५.१.५.१* स्थानिक स्वराज्य संस्था ने सर्व आयएचएचएल लाभार्थ्यांचे आधार सीडिंग सुनिश्चित केले पाहिजे. या घटकासाठी सर्व आर्थिक लाभ (शासकीय आणि/ किंवा खाजगी) (इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सेवेद्वारे) थेट लाभार्थी कुटुंबांच्या आधार-संबंधित बँक खात्यात जमा केले जातील;

*५.१.५.२* आयएचएचएलसाठी अर्ज उमंग ॲपद्वारे किंवा एमएसबीएम ॲपद्वारे एसबीएम पोर्टलवर ऑनलाइन अपलोड करावे . घरगुती शौचालयाच्या बांधकामाची अंतिम पडताळणी स्थान-आधारित तंत्रज्ञानाद्वारे करावी , ज्यात अर्जदारासह बांधकामाची भू-टॅग केलेली छायाचित्रे घ्यावी .

*५.१.५.३* ही छायाचित्रे UMANG किंवा mSBM ॲपद्वारे SBM-Urban २.० MIS वर अपलोड करणे आवश्यक आहे;

*५.१.५.४* स्थानिक स्वराज्य संस्था प्रत्येक अर्जाच्या खरेपणाची पडताळणी अर्ज सादर केल्यावर ७ दिवसांत पडताळणी करेल

### ५.१.६ आयएचएचएलसाठी निधी वितरण व्यवस्था

*( ४.५.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे)*

*५.१.६.१* केंद्र सरकारचा ५०% निधी राज्याला पहिला हप्ता म्हणून, कलम ४.२ मध्ये दिलेल्या अटींच्या पूर्ततेनंतर आणि खालील अतिरिक्त अटीनंतर अदा केला जाईल:

- यूएलबी त्यांचा प्रगती अहवाल एमआयएस पोर्टलवर अपलोड करणे .

*५.१.६.२* केंद्र सरकारचा उर्वरित ५०% निधी दुसरा हप्ता म्हणून खालील अटींची पूर्तता केल्यानंतर राज्याला दिला जाईल,:

